# मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी, २०२५

पृष्ठे ६८ किंमत : रु.१५


वर्ष पंचविसावे

अंक दुसरा











निश्चयाचा महामेरू।
बहुत जनांसी आधारू
अखंड स्थितीचा निर्धारू।
श्रीमंत योगी॥
यशवन्त, कीर्तिवन्त।
सामर्थ्यवन्त, वरदवन्त
पुण्यवन्त, नीतिवन्त।
जाणता राजा॥








## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.
या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २०२५ ◆ वर्ष पंचविसावे ◆ अंक दुसरा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


*– अनुक्रमणिका –*


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **विशेष लेख** | **१०** |
| **पुरस्कार** | **१४** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| ईडन | १६ |
| माझदाचे जादूगार | २६ |
| अमिर खुस्रो | ३६ |
| फ्रीडम ऑन फायर | ४४ |
| रूम नं. ३१२ | ५४ |
| **दिनविशेष** | **६२** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## साहित्य संमेलनाच्या निमित्ताने...

यंदाचे (९९वे) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, भारताची राजधानी दिल्ली येथे संपन्न होत आहे. गतवर्षीचे संमेलन महाराष्ट्रातील खानदेशात अंमळनेर येथे पार पडले होते. पूज्य साने गुरुजींच्या कर्मभूमीत संमेलन झाले. यंदाचे संमेलन दिल्लीत होत आहे ही तमाम महाराष्ट्रातील वाचकांसाठी अभिमानाची बाब आहे. इतिहासाची पाने चाळली तर काही गोष्टी ध्यानात येतात. दिल्लीवर ज्याची सत्ता त्याचे राज्य सर्व भारतभर ही धारणा पूर्वापारची आहे. त्याच दिल्लीत यंदाचे संमेलन आहे हा दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल.

लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथील साहित्य संमेलन पार पडणार आहे. मायमराठीचा जागर या संमेलनाच्या निमित्ताने राजधानी दिल्लीत होणार आहे. सलग तीन दिवस विविध परिसंवाद, कवी कट्टा, कथाकथन, सांस्कृतिक कार्यक्रम यांची रेलचेल असणार आहे. उत्तर भारतात राहणाऱ्या मराठी भाषकांसाठी ही पर्वणीच असणार

आहे. या संमेलनामुळे भाषिक आदान-प्रदानही होईल. मराठी भाषेच्या प्रसारासाठी संमेलनाचे व्यासपीठ उपलब्ध आहे. मराठी साहित्य संमेलनाला खूप मोठी परंपरा आहे. दिल्ली येथे दुसऱ्यांदा साहित्य संमेलन होत आहे. पहिल्यांदा झालेले संमेलन १९५४ साली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले होते.

साहित्य संमेलनाचे फलित काय, हा मुद्दा थोडा वादाचाच म्हणावा लागेल; कारण साहित्य संमेलन आणि वाद हे समीकरणच अलीकडच्या काळात रूढ होताना दिसत आहे. संमेलनात चर्चिल्या जाणाऱ्या परिसंवादातून पुढे काय होते, हाही प्रश्न सतावत राहतोच. संमेलनाला येणारा वाचक आणि त्यातून होणारी ग्रंथखरेदी यावरही गेली काही वर्षे चर्चा रंगलेल्या पाहायला मिळाल्या. मराठी भाषकांसाठी पर्वणी म्हणून जर संमेलनाची ओळख रुजवायची असेल, तर संमेलने ही तालुका पातळीवरील छोट्या-छोट्या गावांत आयोजित केली गेली पाहिजेत. याबाबत उद्‌गीर येथे झालेल्या संमेलनात आम्ही आग्रही भूमिका मांडली होती. आगामी काळात संमेलने तालुका पातळीवर, ग्रामीण भागात आयोजित केली जातील याबाबत आशावाद आहे.

साहित्य संमेलनाच्या माध्यमातून ग्रंथव्यवहारास पूरक अशा बऱ्याच गोष्टी करता येऊ शकतात. ग्रंथप्रदर्शनातून पुस्तकविक्री कशी जास्तीत जास्त होईल यासाठी बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रयत्न केला पाहिजे. तंत्रस्नेही युगात समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करून साहित्य संमेलन हे ग्लोबल झाले पाहिजे. फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर या माध्यमातून संमेलन जगभरात पोहोचवले गेले पाहिजे. या गोष्टी होणे ही काळाची गरज आहे हे आवर्जून नमूद करण्याजोगे आहे.

अगदी अलीकडेच मराठी भाषेला 'अभिजात भाषा' म्हणून दर्जा बहाल केला गेला. ही गोष्ट तशी मराठी भाषेच्या उत्कर्षासाठी हितावह तर आहेच; पण अखिल भारतीय पातळीवरील मान्यताप्राप्त भाषांतील


एक भाषा म्हणून मराठीचे स्थान अधोरेखित झाले आहे, ही गोष्ट अभिमानास्पद आहे. अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने मराठी भाषा संवर्धन व विकासासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न होतील. मराठी भाषा भवन, भाषा विद्यापीठ, भाषाविषयक विविध उपक्रम राबवले जातील. यासाठी शासकीय पातळीवरील आर्थिक बळ, मनुष्यबळ यांचा वापर होईल ही बाब जमेची म्हणावी लागेल.

दिल्ली येथे होणाऱ्या साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

अखिल मेहता

## नवी संहिता... नवा आशय...

# चुंबन




**तसलिमा नासरिन**


अनुवाद

**मंजिरी धामणकर**

सत्य घटनांवर आधारित अस्वस्थ करणाऱ्या कथा

**किंमत : ४१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# ब्रेड, सिमेंट, कॅक्टस




**ॲनी झैदी**

अनुवाद

**सुनंदा अमरापूरकर**

स्थलांतरितांच्या जगण्याची कारणमीमांसा करणारं,
अंतर्मुख करणारं अनुभवकथन

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

T BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर – थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazon kindle | Get it on Apple Books | Google Play Books

## विशेष लेख

### अभिनव, प्रयोगशील ग्रंथजगत

मराठी साहित्यविश्वात ग्रंथप्रकाशन संस्थांच्या मुखपत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. बुद्धिजीवी जगतात लेखक, प्राध्यापक, संपादक-पत्रकार, विचारवंत-व्याख्याते आदी मंडळी प्रकाशनसंस्थांचे मुखपत्र आवर्जून वाचतात, मासिक सभासदही होतात. विशेषतः, महाराष्ट्रात पसरलेल्या सर्वदूर वाचनालयांना ही मुखपत्रे सर्वाधिक उपयोगाची असतात. पुस्तक निवडणे सोयीचे होते.

मराठी साहित्यविश्वात कोणत्या नवनवीन विषय, आशयांवर पुस्तके प्रकाशित झाली आहेत याची माहिती या मुखपत्रांद्वारे होत असते. प्रकाशित पुस्तकांची एकत्रित माहिती मिळण्यासाठी याहून दुसरे उपयुक्त माध्यम नाही.

प्रकाशनसंस्थांच्या अशाच काही मुखपत्रांच्या मांदियाळीत सर्वार्थाने वेगळे ठरावे असे ‘मेहता मराठी ग्रंथजगत’ या वर्षी २५ वर्षे पूर्ण करत आहे. महाराष्ट्रातील आघाडीची प्रकाशनसंस्था ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे हे मुखपत्र रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे.

एका प्रकाशनसंस्थेच्या मुखपत्राने २५ वर्षे पूर्ण करणे सोपे नाही. हल्लीच्या डिजिटल युगात मुळात प्रकाशनसंस्थाच २५ वर्षे टिकेल, हे छातीठोकपणे सांगणे कठीण आहे,



तिथे मुखपत्राची काय शक्यता? असे असूनही 'मेहता मराठी ग्रंथजगत' हे अजूनही वाचकांची उत्सुकता टिकवून आहे, हे विलक्षण आहे.

'मेहता मराठी ग्रंथजगत'चा संपादन सहायक म्हणून मी तीन वर्षे कार्यरत होतो. २००३ ते २००६ या वर्षात, स्वत: प्रकाशक सुनीलजी मेहता, नामवंत ग्रंथसमीक्षक शंकर सारडा यांच्यासह आपलंही नाव छापून येणं हे माझ्यासारख्या विशीतल्या तरुणासाठी अभिमानास्पद होतं.

'ग्रंथजगत'चे वैशिष्ट्य हे की, एखाद्या पुस्तकाइतकीच या मासिकाचीही चर्चा तेव्हा होत असे. याचं कारण म्हणजे नवनवीन पुस्तकांच्या वाचनीय समीक्षणाबरोबरच, कार्यकारी संपादक शंकर सारडा यांचे अग्रलेख आणि 'साहित्यवार्ता' हे अभिनव सदर.

'साहित्यवार्ता' या सदराची चर्चा तेव्हा पुणे, मुंबई तसेच महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रांचे संपादक, पत्रकार, लेखक यांच्यात होत असे. प्रत्येक महिन्यात महाराष्ट्र, देश तथा जगात साहित्यक्षेत्रात कुठे, काय घडलं आहे, याची संक्षिप्त पण आवश्यक तेवढी माहिती आम्ही 'साहित्यवार्ता' या सदरात देत असू. ग्रंथप्रदर्शन, पुस्तक प्रकाशन सोहळे, लेखकांचे व्याख्यान, साहित्य जगतातील घडामोडी दर महिन्याला वाचावयास मिळत असल्यामुळे 'ग्रंथजगत' नियमित वाचण्याची सवय अनेकांना लागली होती. अनेक वर्तमानपत्रांच्या कार्यालयांत, ग्रंथालयांत 'ग्रंथजगत' हमखास दिसत असे.

कार्यकारी संपादक शंकर सारडा सरांचे अग्रलेख हे सरांच्या वाङ्मयीन व्यासंगाचे, साहित्यविश्वातील निरीक्षणाचे आणि भविष्यात साहित्य क्षेत्रात काय बदल येऊ घातले आहेत याचे प्रतिबिंब असे. सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत आदी प्रमुख वृत्तपत्रांच्या तत्कालीन संपादकांनी अनेकवार शंकर सारडा सरांच्या अग्रलेखांचे कौतुक माझ्याजवळ केलेले मला आठवते.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांचे परीक्षण - समीक्षण हा ग्रंथजगतचा महत्त्वाचा गाभा आहे. नवनवीन विषय, आशय असलेली, जगभरातील विविध भाषांतील गाजलेली पुस्तके मराठीत वाचावयास मिळणार, याचे शब्दरूपी 'टीझर' ग्रंथजगतमध्ये झळकत असे. टी-बुक क्लब आदी योजनांमधून वाचकाला बजेट सांभाळता येत असे.

मी ग्रंथजगतचा नियमित वाचक आणि त्याच्या निरंतर बदलाचा साक्षीदार

आहे. सध्या ग्रंथजगतचे स्वरूप बदलले आहे. ते पूर्वीपेक्षा अधिक आशय-विषयकेंद्री झाले आहे. एका विशिष्ट लेखकाला, त्याच्या साहित्यकृतींना, लेखन कामगिरीला यथोचित सन्मान देणे असो, वा विशिष्ट विषय धरून त्याचा सर्वंकष वेध घेण्यात येतो, हा बदलही महत्त्वाचा आहे.

पण, महिनाभरात घडलेल्या साहित्यविषयक घडामोडींची माहिती देणारं 'साहित्यवार्ता' हे सदर पुन्हा एकदा सुरू व्हावं, असं वाटतं; कारण त्या वाचण्याची गंमत फक्त 'ग्रंथजगत'मध्येच आहे.

रौप्यमहोत्सवी वर्ष पूर्ण करणारे ग्रंथजगत, सुवर्णमहोत्सवही साजरा करो, या शुभेच्छा देतो आणि लेखनविराम घेतो. धन्यवाद!

– **अनिरुद्ध पाटील,** लातूर
८७६६८१६८३०
aniruddhaonlineoutlook.com

◆

**ज्येष्ठ साहित्यिक, माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर कालवश**

पुणे : ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचं निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. वर्धा येथे पार पडलेल्या ९६व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांची एकूण ३६ पुस्तकं प्रकाशित झाली. यामध्ये 'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ', रामानंद तीर्थ यांच्यावरील 'कर्मयोगी संन्यासी', 'दीपमाळ' इ. पुस्तकांचा समावेश आहे. महाराष्ट्र फाउन्डेशनचा दिलीप चित्रे स्मृती पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार इ. पुरस्कारांनी ते सन्मानित होते. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे नरेंद्र चपळगावकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

नवी संहिता... नवा आशय...

# गोपीची डायरी

**सुधा मूर्ती**

अनुवाद

**लीना सोहोनी**




'गोपीची डायरी' आहे खास, रंगीत चित्रांचा ल्यायलाय तिने साज. सुधा मूर्तींची रौप्यमहोत्सवी साहित्यकृती, वाचकांसाठी आनंदाची अनुभूती


**किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी

**सुधा मूर्ती**

अनुवाद

**लीना सोहोनी**




भारतातल्या आघाडीच्या बालसाहित्यकार सुधा मूर्ती यांच्या लेखणीतून उतरलेल्या कथामालिकेतील एक नवीन रोमांचकारी साहसकथा

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पुरस्कार

## उमा कुलकर्णी यांना
## एस. एल. भैरप्पा साहित्य प्रतिष्ठान पुरस्कार

पुणे : म्हैसूरच्या एस. एल. भैरप्पा साहित्य प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'एस. एल. भैरप्पा साहित्य प्रतिष्ठान पुरस्कार' ज्येष्ठ अनुवादक उमा कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. एक लाख रुपये रोख आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. १९ जानेवारी, २०२५ रोजी बंगळूरू येथे पार पडलेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक एस. एल. भैरप्पा यांच्या हस्ते उमा कुलकर्णींना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कुलकर्णी यांची ५५ अनुवादित पुस्तके प्रकाशित झालेली असून, भैरप्पांच्या बहुतांश पुस्तकांचा मराठी अनुवाद त्यांनी केला आहे. ज्या लेखकाची बहुतांश पुस्तके अनुवादित केली त्याच लेखकाच्या नावाचा पुरस्कार लाभणे आणि त्याच लेखकाच्या हस्ते तो स्वीकारायची संधी मिळणे हा भाग्ययोगच म्हणावा लागेल. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे उमा कुलकर्णी यांचं मन:पूर्वक अभिनंदन.




## श्रीया भागवत यांना
## कै. मधुसूदन मुकुंद शारंगपाणी पुरस्कार

पुणे : पुणे मराठी ग्रंथालयातर्फे प्रतिवर्षी देण्यात येणारा कै. मधुसूदन मुकुंद शारंगपाणी पुरस्कार या वर्षी श्रीया भागवत यांना त्यांनी अनुवादित केलेल्या 'आकु आकु' या पुस्तकासाठी प्रदान करण्यात आला. पुणे मराठी ग्रंथालयाच्या केशव सभागृहात २२ जानेवारी, २०२५ रोजी हा पुरस्कार त्यांना डॉ. विद्याधर ताठे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे श्रीया भागवत यांचं मन:पूर्वक अभिनंदन.

◆



## पुस्तकाच्या पानांतून




# ईडन

**देवदत्त पट्टनायक**

*देवदत्त पट्टनायक यांच्या प्रदीर्घ अभ्यास आणि आकलनातून साकारलेलं धर्मविषयक चिंतन*

### केन आणि एबल

ॲडम आणि ईव्ह यांना अनेक अपत्यं झाली. त्यांच्यापैकी एक होता केन. त्याने मातीची मशागत करून शेती करण्यास सुरुवात केली आणि तो जगातील पहिला शेतकरी बनला. दुसरा मुलगा होता एबल. याने पशुपालनास सुरुवात केली

आणि तो जगातील पहिला मेंढपाळ बनला. एबलने आपल्या कुटुंबासाठी मेंढ्या, बकरी आणि उंट यांच्या केसांपासून विणलेले तंबू बनवले.

दोन्ही भावांनी आपल्या मनातील कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी देवाला काही वस्तू अर्पण केल्या, केन हा स्वभावाने जरा कंजूष होता तर एबल हा दिलदार स्वभावाचा होता. त्यामुळे एबलने देवाला अर्पण केलेला नजराणा देवाला अधिक पसंत पडला. ते पाहून केनला एबलविषयी असूया वाटू लागली.

एक दिवस केन आपला भाऊ एबल याला वाळवंटात घेऊन गेला आणि त्याने त्याची हत्या केली. अशाप्रकारे, जगातील पहिला शेतकरी पहिला मारेकरी ठरला. इतक्यात तिकडून एक डोमकावळा उडत आला. त्याने आपल्या पंज्यांच्या तीक्ष्ण नखांनी जमीन खोदून त्यात एबलला कसं गाडायचं आणि आपला गुन्हा कसा लपवायचा ते केनला दाखवलं. परंतु देवाने आपला हा गुन्हा पाहिला आहे, हे केनला कळून चुकलं. या जगात देवाच्या नजरेआड काहीच होऊ शकत नाही, त्याच्यापासून कुठलीच गोष्ट लपत नाही.

'एबल कुठे आहे?' असं देवाने केनला विचारताच केन म्हणाला, 'मला नाही माहीत. मी काय माझ्या भावाचा राखणदार आहे का?' थोडक्यात काय, जगातील पहिला मारेकरी हा जगातील पहिला खोटारडा मनुष्यसुद्धा होता. पण देवाला तर सर्वच ठाऊक असतं, म्हणून त्याने केनला घराबाहेर काढलं आणि त्याला कुटुंबीयांप्रमाणे तंबूत राहण्यास मनाई केली. त्याचबरोबर देवाने केनला चिन्हांकित केलं म्हणजे आता ॲडमच्या पुढच्या पिढ्या केनला मारून टाकणार नाहीत आणि केन मृत्यूपर्यंत गुन्ह्याच्या दोषामध्ये जगत राहील.

केन हा पहिला परिघाबाहेरील मानव (Outsider) बनला. त्याने जमिनीवर आपल्या भावाचं रक्त सांडलेलं असल्याने, तो कधीही पृथ्वीवर शेती करू शकणार नव्हता. त्याची कुटुंबाबाहेर हकालपट्टी झाल्यानंतर त्याने दगडी घरांपासून पहिलं नगर वसवलं. या नगरात बाजार भरत आणि तिथे शेतात आणि कळपात तयार करण्यात आलेली उत्पादनं विक्रीसाठी पाठवण्यात येत.

एबलचा मृत्यू झाल्यानंतर शोकविव्हल झालेले ॲडम आणि ईव्ह यांनी आपल्या मुलावर अंत्यसंस्कार केले. हे जगातील पहिले अंत्यसंस्कार होते.

लवकरच ॲडम आणि ईव्ह यांना सेथ नावाचा मुलगा झाला. त्याने देवाचे नियम शिकून घेतले, चांगल्या-वाइटातील फरक कसा ओळखायचा तेही तो शिकला. त्याला, ॲडमने गुप्त ज्ञान दिलं. पुढे लोक या ज्ञानाला कबाला म्हणून ओळखू लागले.

- मेंढपाळ कातडीच्या घरात राहत आणि गुरांचं दूध काढत, तर शेतकरी हे मातीच्या घरात राहत आणि बियाणं पेरून शेती करत मेंढ्या, शेळ्या, गुरेढोरे आणि उंट पाळणारे आणि एका जागी स्थायिक होऊन शेतजमीन कसणारे, कालवे उभारणारे आणि जनावरांचा रस्ता अडवणारे अशा गटांमध्ये अगदी सुरुवातीपासूनच वैमनस्य दिसून येतं. अब्राहमिक लोककथासाहित्य या भटक्या लोकांना अनुकूल असल्याचं दिसून येतं.
- कथेचे मूळ मेसोपोटेमियन पौराणिक कथांमध्ये आहे. डुमुझिड नावाचा मेंढपाळ आणि एन्किम्डू नावाचा शेतकरी यांच्यात इनाना या देवतेची कृपादृष्टी प्राप्त करण्यासाठी स्पर्धा सुरू होते. तेव्हा ती देवी मेंढपाळाची निवड करते. मग शेतकऱ्यांचा देव- एमेश आणि मेंढपाळांचा देव- एन्टेन त्यांच्यात डुमुझिड आणि एन्किम्डू यांच्यातील चांगला कोण याविषयी वादावादी होते. मग ते याचा न्यायनिवाडा करून घेण्यासाठी देवांचा अधिपती एन्लिल याच्याकडे जातात. तो त्या दोघांमधून मेंढपाळाची निवड करतो.
- ज्यू धर्मात, केन हा ॲडमचा मुलगा नाही तर तो सैतानाचा किंवा राक्षसाचा मुलगा आहे, ज्याने ईव्हवर गुप्तपणे बलात्कार केला होता.
- ‘केनचे चिन्ह’ किंवा ‘केनचा शाप’ म्हणजे देवाने त्याचा चेहरा काळा करून टाकला होता, असा समज आहे. अमेरिकन लोकवाङ्मयात कृष्णपंथीयाच्य वंशाची सुरुवात त्याच्यापासून झाली असल्याचं म्हणण्यात आलं आहे. खरंतर ही युरोपियन वसाहतवाद्यांनी मुद्दामच तयार केलेली एक काल्पनिक कथा आहे. एकोणिसाव्या शतकात आफ्रिकन लोकांच्या गुलामगिरीचं समर्थन करण्यासाठी या कथेचा वापर करण्यात येत असे.

- केनने दगडाने ठेचून एबलची हत्या केली. त्यामुळे पुढे त्याच्या मुलांनी बांधलेल्या दगडी घराच्या भिंती त्याच्या अंगावर कोसळून त्यात त्याचा मृत्यू झाला. इतर पारंपरिक कथांनुसार केनच्या डोक्यावर शिंग उगवतं, त्यामुळे दूरवरून तो एखादा प्राणी असल्यासारखाच भासतो. एक दिवस त्याचा नातू त्याला रानटी श्वापद समजून त्याच्यावर दगड भिरकावून त्याची हत्या करतो.
- ख्रिश्चन कथेनुसार, आपला मुलगा केन हा त्याच्या भावाचं, एबलचं रक्त पीत असल्याचं ईव्हला स्वप्न पडलं. ही भविष्यवाणी खरी होऊ नये म्हणून दोघा भावांनी मुद्दामच वेगवेगळे व्यवसाय स्वीकारले आणि ते एकमेकांपासूनदूर राहिले. इनोकच्या आवृत्तीनुसार (Book of Enoch) एबल हा अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या हुतात्म्यांपैकी पहिला मानव होता.
- इस्लामिक कथेनुसार ईव्हने जुळ्या मुलांना जन्म दिला: एक मुलगा आणि एक मुलगी. हाबिलने (एबलने) अक्लिमाशी विवाह करायचं ठरवलं. ती काबिलची (केनची)ची जुळी बहीण. पण ती अत्यंत सुंदर असल्याने काबिललाच तिच्याशी विवाह करण्याची इच्छा झाली. त्यामुळे त्याने या दोघांच्या लग्नाला विरोध केला आणि हाबिलवर हल्ला केला. हाबिलने आपल्या भावाकडे खूप विनवण्या केल्या. एकाने दुसऱ्याची हत्या केली, तर त्याच्या माथी केवळ त्या हत्येचंच पाप येतं असं नव्हे, तर त्याने ज्या व्यक्तीचा बळी घेतलेला असतो, त्या व्यक्तीकडून आयुष्यात घडलेल्या सर्व दुष्कृत्यांचं पातकही त्याला शिरावर घ्यावं लागतं, असंही त्याने काबिलला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. हे असं घडतं, कारण जो पीडित असतो, त्याचा हकनाक बळी गेल्यामुळे त्याच्या आधीच्या आयुष्यात त्याने केलेली सर्व पातकं आपोआप धुवून निघतात आणि त्याचं शुद्धीकरण घडतं. पण त्याच्या या विनवण्यांचा काबिलवर कोणताही परिणाम झाला नाही. त्याने हाबिलची हत्या केली. त्यानंतर त्याला त्याच्या भावाच्या मृतदेहाचं दफन करण्यात मदत करण्यासाठी आणि आपला गुन्हा कसा लपवायचा हे त्याला शिकवण्यासाठी, अल्लाने एका कावळ्याला पाठवलं. त्यामुळे

कबिलचं मन अपराधीपणाने आणि लज्जेने भरून गेलं. आपण हा गुन्हा आजूबाजूला कोणी नसताना केला आहे असं त्याला वाटत होतं, तरीसुद्धा तो अल्लाच्या नजरेतून सुटला नव्हता. या हत्येनंतर सैतानाने ईव्हकडे जाऊन तिला हाबिलच्या मृत्यूची बातमी सांगितली. पण ईव्हला 'मृत' म्हणजे काय हे माहीत नव्हतं. म्हणून सैतानाने तिला ते स्पष्ट करून सांगितलं. 'तो मृत आहे, म्हणजे तो खात नाही, पित नाही, बोलत नाही, हालचाल करत नाही किंवा श्वास घेत नाही.' हे ऐकून ईव्ह शोकविव्हल झाली आणि ती आक्रोश करू लागली. अशा रीतीने ईव्ह ही जगातील पहिली शोकाकुल व्यक्ती ठरली.

- आणखी एका इस्लामिक कथेनुसार आदम आणि हव्वा यांना एक मुलगा होता. त्याचे नाव सीश. आदमने त्याला नीतिशास्त्राचे धडे दिले आणि काबिलशी लढा देऊन त्याला ईश्वराच्या मार्गावर परत आणण्याची कामगिरी सोपवली. पण काबिलने मूर्तिपूजेचा पुरस्कार केला. त्याने आदम आणि हव्वाच्या मूर्ती घडवल्या आणि त्यांची उपासना करण्यास सुरुवात केली. त्यामुळे सीशने काबिलचा आणि त्याच्या संपूर्ण कुळाचा नि:पात केला.
- हिंदू परंपरेत कृष्ण हा गुराखी आहे तर त्याचा भाऊ बलराम शेतकरी आहे. ते एकमेकांचे सावत्र भाऊ आहेत. पण त्या दोघांचा पिता एकच आहे. त्या दोघांचंही एकमेकांवर निरतिशयप्रेम आहे, याचं कारण असं की दोघेही विष्णूचे अवतार आहेत, एकाच आत्म्याची (विस्तारित सुरक्षित मनाची) दोन प्रकटीकरणं आहेत, त्यामुळे त्यातला एक भाग हा दुसऱ्या भागाला आपलाच मानतो. निर्माता ब्रह्मदेवाची मुले नेहमी मालमत्तेवरून एकमेकांशी भांडतात; हे अहमचे सूचक आहे (अहंकार, किंवा पिळलेले असुरक्षित मन), दुसऱ्याला स्वत:चा भाग म्हणून पाहण्यातले अपयश.

## इद्रिसने इजिप्त शोधले

ॲडमच्या मुलांनी देवाच्या नियमांचं पालन करण्याची आत्यंतिक धडपड

केली. सेथला देवाच्या ज्या नियमांची माहिती होती, त्यांचं पालन इद्रिससारख्या फारच कमी लोकांनी केलं. इद्रिस हा एक धीरोदात्त माणूस होता. त्याच्या आयुष्याच्या उत्तरार्धात, देवाने त्याला प्रेषित बनवलं आणि त्याने आपल्या लोकांमध्ये देवाच्या संदेशाचा प्रसार केला. त्याचे लोक म्हणजेच बॅबिलोनचे रहिवासी. त्यांना हा जे काही सांगत होता, त्यात काहीच स्वारस्य नव्हतं. त्यामुळे त्या लोकांची कानउघाडणी करण्यापेक्षा आपण स्वत:च दूर निघून जावं, असं त्यानं ठरवलं. तो मेसोपोटेमियाहून दक्षिणेकडे प्रवासाला निघाला आणि अखेर वाळवंट पार करून तो नाईल नदीच्या काठी जाऊन पोचला. उत्तरेकडे वाहत जाणाऱ्या त्या विस्तीर्ण नदीच्या पात्राच्या दोन्ही बाजूला हिरवीगार सुपीक जमीन पसरली होती. ती खजूर आणि पपायरसने भरलेली होती. ते दृश्य पाहून तो हर्षभरित झाला आणि त्याच्या तोंडून आपोआप 'सुभान-अल्लाह' (देवाची निर्मिती आनंददायक आहे) असे उद्‌गार निघाले. अशाप्रकारे, इजिप्तच्या भूमीचा शोध लागला.

इनोकने देवाच्या नियमांचं इतक्या उत्तम रीतीने पालन केलं, की त्याला अमरत्व प्राप्त झालं. फक्त एक दिवस तो अचानक या पृथ्वीतलावरून नाहीसा झाला आणि देवाने त्याला स्वर्गात नेलं. पण त्याच्या बहुतेक अनुयायांनी देवाच्या नियमांचं उल्लंघन केलं. त्यांना सैतानानं भुरळ पाडली आणि त्यांना हिंसेच्या, मूर्तिपूजेच्या मार्गाला लावलं. मानवजातीकडून हे असे अपराध वारंवार होत चालले होते. अखेर त्याला कंटाळून देवाने मुसळधार पर्जन्यवृष्टी सुरू केली. पृथ्वीवर जागोजागी पूर आणायचे आणि परत नव्याने सुरुवात करायची असा निर्णय त्याने घेतला.

- इद्रिसने इजिप्तचा शोध कसा लावला याची ही कहाणी फक्त इस्लामिक लोककथांमध्येच आढळते. याच इद्रिसला ज्यू धर्मात इनोक म्हणून ओळखण्यात येतं.
- एकेकाळी 'बुक ऑफ इनोक' हा ज्यू आणि ख्रिश्चन लोकवाङ्‌मयाचा भाग होता. या पुस्तकाची निर्मिती सुमारे २००० वर्षांपूर्वी झाली. पण आता मात्र हे पुस्तक प्रमाण मानण्यात येत नाही, कारण हे पुस्तक राक्षसांबद्दलच्या प्रचंड माहितीने भरलेलं होतं आणि त्यामागची प्रेरणा निषिद्ध काळ्या शक्तींपासून आलेली होती, हे नंतर लक्षात

आलं. या पुस्तकात पतित देवदूतांनी मानवी स्त्रियांशी कसा समागम केला व त्यातून राक्षस कसे जन्माला आले, त्याविषयी मजकूर होता. या राक्षसांना देवदूतांनी तंत्रज्ञान शिकवलं. त्यांचा विनाश करण्यासाठी देवाला पृथ्वीवर पूर आणावे लागले. पण त्यापूर्वी देवाने मुख्य देवदूत उरीएल याला नोहाला सावध करण्यासाठी पृथ्वीवर पाठवून दिलं. नोहाने त्यानंतर एका भल्या मोठ्या जहाजाची उभारणी केली. त्याने त्या जहाजाच्या सहाय्यानं निष्पाप आणि विश्वासू लोकांचं संरक्षण केलं.

## नोहाचं जहाज

सर्व मानवांमध्ये, फक्त एक माणूस देवाने घालून दिलेल्या नियमांना जागला, तो म्हणजे नोहा. हा इनोकचा पणतू होता. त्याने इनोकला झालेल्या दृष्टान्तांबद्दल ऐकलं होतं. चांगले लोक कसे आज्ञाधारक मेंढरांसारखे असतात आणि वाईट लोक आज्ञेचं उल्लंघन करणाऱ्या रानटी श्वापदांसारखे असतात, हे त्या दृष्टान्तात इनोकला दिसलं होतं. त्याने लोकांना कायद्याचं पालन करण्याचं महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला, परंतु तो उगीचच आपण स्वत: ईश्वराचा प्रेषित असल्याचा आव आणतोय, असा त्याच्यावर आरोप करून लोकांनी त्याची संभावना केली, इतकंच नव्हे तर सैतानाने त्याच्यावर जादूटोणा केल्याचा आरोपही केला.

देवाने नोहावर एक अवाढव्य नौका उभारण्याचं काम सोपवलं. ती नौका इतकी प्रचंड असणार होती, की त्यात त्याचे कुटुंबीय, त्याचप्रमाणे जगातील सर्व प्राण्यांच्या जाती-प्रजातींमधील एक युगुल (नर-मादी) यांना सामावून घेता येईल. नोहाने ही अतिभव्य नौका उभारण्याचं काम जमिनीवरच पूर्ण केलं. ते पाहून हा नोहा वेडा झाला आहे की काय, असंच सर्वांना वाटलं. कोणी इतकी महाकाय नौका जमिनीवर का बांधेल? पण नोहाची ईश्वरावर श्रद्धा होती. त्याने ईश्वराच्या आज्ञेचं पालन केलं. त्याने ती नौका बांधून पूर्ण केली, सर्व प्रकारच्या सजीवांना त्यात सामावून घेतलं. त्याचप्रमाणे त्यावर आपली पत्नी आणि तीन मुलं आणि त्यांच्या बायकांनाही बोलावून घेतलं व ते सर्वजण ईश्वराच्या भाकीतानुसार हे जग महापुराने कधी भरून

जातं याची वाट बघत आपलं जीवन जगू लागले.

मग, जणूकाही आकाशातून नद्याच वाहू लागल्यासारखं वाटावं इतका मुसळधार पाऊस सुरू झाला. सर्व पृथ्वी पाण्याखाली बुडून गेली. नोहाची थट्टा करून त्याला अपमानास्पद वागणूक देणाऱ्या, ईश्वराने घालून दिलेले नियम धुडकावून लावून आपलं जीवन जगत आलेल्या सर्वांना त्या पुरात जलसमाधी मिळाली. आधी जमिनीवर उभी असलेली नोहाची नौका आता सर्व पृथ्वीला गिळंकृत करून राहिलेल्या पाण्यात तरंगत होती. त्या नौकेभोवती पावसाचे मोठमोठे खांब आणि पावसाचे पडदे तयार झाले होते. नौकेच्या डोक्यावर देवाच्या क्रोधाचे साक्षीदार असलेले गडद वादळी ढग होते.

बऱ्याच आठवड्यांनंतर अखेर तो पाऊस थांबला. आपल्या नौकेला काठावर नेण्यासाठी कुठे एखादा जमिनीचा पट्टा सापडतो आहे का, हे पाहण्यासाठी नोहाने एका कबुतराला उडत बाहेर पाठवलं. त्यानंतरचे काही दिवस रोज ते कबुतर चोचीत एकही पान किंवा गवताचा कोंबही न धरता थकूनभागून नौकेवर परत येई. त्याचा अर्थ एकच होता, जवळपास कुठेही कोरडी जमीन नव्हती.

अखेर एक दिवस ते कबुतर आपल्या चोचीत ऑलिव्हची फांदी पकडून परत आलं. त्यानंतर अखेर जेव्हा बरंच पाणी ओसरलं, तेव्हा नोहाने आपली नौका एका ठिकाणी उतरवली. ते अरारत नावाचं पर्वतशिखर होतं.

आपण मानवजातीचा कधीही विनाश करणार नाही असं देवाने नोहाला वचन दिलं. नोहाने कधीही मानवी रक्त भूमीवर सांडू नये असं देवानेच त्याला सांगितलं होतं. देव आणि मानव यांच्यातील या नव्याने प्रस्थापित झालेल्या नात्याचं प्रतीक म्हणून देवाने आकाशात इंद्रधनुष्य तयार केलं.

त्यानंतर या पृथ्वीवर लोकसंख्या वाढवून मानवजातीचा विस्तार करण्यासाठी नोहाच्या पुत्रांनी वेगवेगळ्या दिशांना कूच केलं. त्याचा मोठा मुलगा शेम याच्यापासून सेमाइट लोक आले.

- नोहाचे तीन मुलगे आणि त्यांच्या पत्नींनी मिळून या जगातील सर्व लोक निर्माण केले असावेत, असं मानण्यात येतं. नोहाचा मुलगा शेम याने सेमिटिक वंशांना जन्म दिला. कॉकेशियन या शब्दाप्रमाणे सेमिटिक ही संज्ञासुद्धा अठराव्या शतकात उदयास आली. त्यापासून

कालांतराने अँटी-सेमिटिक किंवा सेमिटिक-विरोधी हा शब्द तयार झाला. जे लोक ज्यू लोकांचा वैचारिक विरोध करतात, त्यांचा तिरस्कार करतात, त्यांचा मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार नाकारतात आणि बँकिंग व व्यापारक्षेत्रात त्यांनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल त्यांचा द्वेष करतात, अशा लोकांसाठी हा शब्द वापरण्यात येतो.


- ख्रिश्चन लोकवाङ्मयात नोहाची नौका हे ख्रिश्चन चर्चचं प्रतीक आहे. जो या नौकेत आश्रय घेईल तो 'प्रलया'पासून वाचेल आणि त्याला मोक्षप्राप्ती होईल. ते कबुतर जेव्हा आपल्या चोचीत ऑलिव्हची फांदी घेऊन नौकेकडे परत येत होतं, तेव्हा त्याला पाहून, नोहाने ईश्वराची करुणा भाकण्यासाठी आपल्या दोन्ही हातांचे तळवे स्वर्गाच्या दिशेने उंच उचलून धरले. त्याच्या या कृतीला 'ओरान्स' असं म्हणतात, आणि ते ईश्वराला शरण जाण्याचं द्योतक आहे.
- इस्लामिक कथांमध्ये, नोहाला नूह असं नाव आहे. नूह आदमच्या नंतरचा पण अब्राहमच्या आधीचा एक प्रेषित होता. त्याला यम नावाचा चौथा मुलगा होता, त्याने आपल्या वडिलांच्या सांगण्यावर विश्वास ठेवला नाही. त्यामुळे तो नौकेत चढला नाही आणि पुरात बुडाला.
- नोहाची पत्नी, नमाह, ही सुद्धा अश्रद्ध होती त्यामुळे तीसुद्धा नोहाच्या सोबत त्या नावेत चढली नाही.
- जेव्हा पूर संपला तेव्हा नोहाने 'नूस' नावाचा पदार्थ, सुकामेवा आणि धान्य वापरून एक गोड खिरीसारखं पक्वान्न बनवलं. याला 'नोहाचं पुडिंग' म्हणतात.
- ख्रिश्चन धर्मशास्त्रात दिलेल्या माहितीनुसार, नोहाने पहिला द्राक्षमळा तयार केला. मद्यपान करून चूर होणारा नोहा हा पहिला मानव होता. त्याचा मुलगा हॅम याने पित्याला नग्नावस्थेत झोपलेलं पाहिलं; परंतु पित्याचं अंग झाकण्याऐवजी त्याने हसून त्यांची खिल्ली उडवली आणि आपल्या भावांना आपले वडील मद्यधुंद अवस्थेत कसे नग्न झोपले आहेत, याविषयी सांगितलं. त्यानंतर त्या भावांनी आपल्या पित्याच्या अंगावर पांघरूण घातलं. हॅमच्या

या उद्दाम वर्तनासाठी त्याला शाप देण्यात आला. त्याची मुले गुलाम बनतील असा तो शाप होता.

- आयरिश लोकवाङ्मयातील कथेनुसार, नोहाला सेसेयर नावाची एक नात असते. आपल्याला आपल्या आजोबांच्या नौकेत स्थान मिळणार नाही, हे तिला समजताच ती स्वत:च काही जहाजं बांधून तयार करते आणि काही स्त्री-पुरुषांना त्यात बसवून आपल्याबरोबर पश्चिमेला असलेल्या एका देशात घेऊन जाते. अशा तीन जहाजांमध्ये बसून पन्नास महिला आणि तीन पुरुष आयर्लंडला जाऊन पोहोचतात. मग त्या पन्नास स्त्रिया तीन पुरुषांना आपापसात वाटून घेतात. परंतु दुर्दैवाने त्यांच्यातल्या दोन पुरुषांचा मृत्यू होतो आणि तिसरा पुरुष त्या इतक्या सर्व महिलांना एकट्याने तोंड कसं द्यायचं या भीतीपोटी पळून जातो. या अयशस्वी प्रयत्नानंतर सेसेयर एकाकी होते आणि हा दु:खाचा आघात न सोसून ती दयनीय रीतीनं मरण पावते. स्त्रियांना तोंड देण्याच्या भीतीने पळून गेलेला तो तिसरा फिंतान नावाचा पुरूष मात्र वाचतो. एक चमत्कार घडतो आणि त्याचं रूपांतर सामन नावाच्या माशात होतं, त्यानंतर त्याचं रूपांतर एका बहिरी ससाण्यात होतं आणि अखेर तो पुन्हा मनुष्याच्या रूपात परत येऊन पुरातून वाचतो... नंतर तो आपल्या पुढच्या पिढ्यांना ही कथा सांगतो.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# माझदाचे जादूगार

**अश्विन सांघी** अनुवाद : **मुग्धा गोखले**

*विश्वभ्रमंती घडवत आत्मपरीक्षणाचा साक्षात्कार घडविणारं अनोखं कथानक असलेली अश्विन सांघी यांच्या भारत मालिकेतील रंगतदार कादंबरी...*

१

पिस्तुलाचा चाप खेचणं इतकं सहजसोपं असेल, हे त्या गणवेशधारी इसमास माहीतच नव्हतं.

त्या दिवशी संध्याकाळी पाऊस पडत होता. तो इसम सुरक्षारक्षकांच्या घोळक्याबरोबर, लंडनमधील फॅशनेबल

आणि गजबजलेल्या ब्लूम्सबरी जिल्ह्यातील ग्रेट रसेल मार्गावरून चालत जात होता. वाहनांना अटकाव करण्यासाठी उभारलेल्या लहानशा जाडजूड खांबांना वळसा घालून, ते सगळे एका लोखंडी काळ्या कुंपणाच्या फाटकातून आत शिरले. त्यानंतर एक यार्डभर अंतर सरळ चालत जाऊन ते एका भव्य इमारतीपाशी पोचले. निओक्लासिकल प्रकारची वास्तुरचना असलेली ती इमारत जॉर्जियनकालीन होती. ती इमारत म्हणजेच सुप्रसिद्ध ब्रिटिश म्युझियम. या म्युझियमच्या रक्षणासाठी असलेल्या, उत्कृष्ट दर्जाच्या सुरक्षारक्षकांच्या गटात तीनशेहून अधिक स्त्री-पुरुषांचा समावेश होता आणि ते सर्व जण सदैव ब्रिटिश म्युझियमवर पहारा देत असत.

पंचाहत्तर हजार स्क्वेअर मीटर एवढ्या अवाढव्य परिसरात वसलेल्या त्या संग्रहालयात आठ दशलक्ष वस्तू प्रदर्शनासाठी मांडलेल्या होत्या. बऱ्याचदा, एका दिवसात साधारण सतरा हजार लोक तिथल्या त्या भव्यदिव्य दालनांमध्ये संग्रहालय बघण्यासाठी येत असत. सतराशे त्रेपन्न साली बांधलेलं हे संग्रहालय अनेकदा वादग्रस्त किंवा नकारात्मक चर्चेचा विषय बनत असे. अर्थात त्याचं कारणही तसंच होतं. संग्रहालयातल्या जवळजवळ सगळ्याच प्रदर्शनीय वस्तू, ब्रिटनची राजवट असणाऱ्या जगभरातील वेगवेगळ्या देशांमधून आणलेल्या होत्या. वसाहतवादी ब्रिटिश राजवटीच्या भूतकाळाची चांगलीच गंभीरपणे चिकित्सा केली जाऊन त्यावर खरमरीत टीका होऊ लागली होती. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी, जिंकलेल्या प्रदेशातून तिथला राष्ट्रीय खजिना लुटून नेला होता, हे त्या टीकेचं एक कारण होतं.

अर्थात, ही गोष्ट माहीत असूनही संग्रहालय बघायला येणाऱ्या लोकांचं कुतूहल मात्र मुळीच कमी होत नव्हतं. संग्रहालय बघताना ते आश्चर्यचकित होऊन डोळे विस्फारून बघू लागत.

जगातील काही अमूल्य वस्तू त्या संग्रहालयात होत्या. इजिप्शियन चित्रलिपीचा अर्थ लावण्यासाठी महत्त्वाची गुरुकिल्ली मानला गेलेला, इजिप्तच्या इतिहासाची साक्ष देणारा, रोझेटा स्टोन त्या संग्रहालयात होता. ख्रिस्तपूर्व १३९० ते १३२५ या काळात इजिप्तवर राज्य करणाऱ्या ॲमेनहॉटेप (तिसरा) या राज्यकर्त्याच्या, उर्फ फॅरोच्या, ग्रॅनाईट दगडात घडवलेल्या विशालकाय पुतळ्याचे भलेमोठे डोके तिथे होते. आणखी एक मौल्यवान वस्तू होती तिथे आणि ती म्हणजे इसवीसन सातव्या शतकातील ईस्ट

ॲन्गिलअन राजाचे शिरस्त्राण. सटन हू येथे प्राचीन काळी दफन केलेल्या जहाजात हे शिरस्त्राण सापडले होते. त्याशिवाय तिथे इतर सर्वांपेक्षा विख्यात अशी वस्तू होती आणि ती म्हणजे पुरातनकालीन सायरस सिलेंडर. ह्या मातीच्या दंडगोलावर, महान अकीमेनिड सम्राट सायरस याचा जाहीरनामा अकेडियन क्युनिफॉर्म या प्राचीन लिपीत कोरलेला होता. पहिलं पर्शियन साम्राज्य स्थापन करणारा हा सम्राट इसवीसन सहाव्या शतकातील महान राज्यकर्ता होता.

सुरक्षारक्षकांचा घोळका संग्रहालयापाशी पोचला तेव्हा संध्याकाळ झाली होती. झटपट पण तरीही बारकाईने सगळीकडचं निरीक्षण करून त्या घोळक्यानं संग्रहालयातील 'क्वीन एलिझाबेथ-२ ग्रेट कोर्ट' हा विशाल मध्यवर्ती भाग पार केला. ह्या ग्रेट कोर्ट भागाचं छत खूप उंचावर होतं आणि ते स्टील आणि काचांच्या मजबूत जाळीने बंदिस्त केलेलं होतं. ह्या भागाला पूर्वी छत नव्हतं, पण आजूबाजूच्या गॅलऱ्यांमधील मौल्यवान वस्तूंच्या सुरक्षेसाठी हे छत नंतर बांधण्यात आलं होतं.

त्या घोळक्यातला एक सुरक्षारक्षक, कुणाच्या लक्षात येऊ न देता, हळूच इतरांपासून बाजूला झाला आणि ५२ क्रमांकाच्या दालनाकडे निघून गेला. संग्रहालयातल्या अनेक गॅलऱ्यांपैकी एकीत होतं हे दालन. दालन क्रमांक ५२ च्या अगदी जवळ पोचल्यावर तो तिथल्याच एका सामान ठेवायच्या भल्यामोठ्या कपाटात लपून बसला. हे कपाट त्यानं आधीच हेरून ठेवलेलं होतं. त्यानं आधीच संग्रहालयाची पूर्ण माहिती करून घेतली होती. एक प्रकारे नकाशाच तयार केला होता आणि त्यात सुरक्षेसाठी असणाऱ्या कॅमेऱ्यांच्या जागाही खुणेने दर्शवल्या होत्या. स्वतः सुरक्षारक्षक असल्यामुळे त्याच्यासाठी हे काम अगदीच सोपं झालं होतं. संपूर्ण संग्रहालयास अत्यंत काटेकोररीत्या उच्च दर्जाची सुरक्षा पुरवण्यात आलेली होती. जागजागी कॅमेरे बसवलेले होते, धोक्याची सूचना देणाऱ्या घंट्या ठिकठिकाणी बसवलेल्या होत्या. शिवाय प्रवेशासाठी कडक नियमावली, त्यावरील काटेकोर नियंत्रण आणि डिजिटल रेडिओ सिस्टिमसुद्धा कार्यरत होती.

तो माणूस त्या कपाटातच बसून राहिला.

पाच वाजता सुरक्षारक्षकांचा गट सर्व लोकांना संग्रहालयाबाहेर जाण्याची विनंती करू लागला आणि त्यासोबतच संग्रहालयाला भेट दिल्याबद्दल

त्यांचे आभारही मानले जाऊ लागले. त्यानंतर एका तासाने खाद्यपदार्थ पुरवणारे केटरर्स आत आले. साधारण सात वाजेपर्यंत संपूर्ण ग्रेट कोर्टचं रूप पालटलं. टेबले मांडली जाऊन त्यांच्यावर सुंदर वेलबुट्टीदार नक्षी विणलेले टेबलक्लॉथ घालण्यात आले. फुलांनी सजलेल्या फुलदाण्या ठेवल्या गेल्या, जेवणाची सामग्री मांडण्यात आली. तिथे एका कॉर्पोरेट इव्हेंटचे आयोजन करण्यात येणार होते. तो कार्यक्रम संपेपर्यंत दहा वाजले.

ग्रेट कोर्टाच्या त्या सुंदर छताखाली दिवसभर चालू असणारा गजबजाट साधारण मध्यरात्रीच्या सुमारास शांत झाला. त्या गोलाकार ग्रेट कोर्टच्या अवतीभवती असलेल्या, जणू गुहेसारख्या भासणाऱ्या, गॅलऱ्यांमधून गहनगूढ शांतता पसरू लागली. मानवी इतिहासातील नानाविध टप्प्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कितीतरी वस्तूंनी प्रत्येक गॅलरी ओतप्रोत भरलेली होती. हे संग्रहालय झपाटलेले आहे आणि रात्रीच्या वेळी काही विचित्र आवाज ऐकू येतात, असं काही लोकांचं म्हणणं होतं. आज मात्र त्या भुतांनीदेखील सुट्टी घेतली होती बहुतेक.

मध्यरात्र उलटून गेल्यावर जरा वेळाने त्या भल्यामोठ्या कपाटाचं दार उघडलं. सुरक्षारक्षक हळूच बाहेर आला आणि 'केस नं. ४, वस्तू क्रमांक १८८०.०६१७. १०४१' या प्रदर्शनीय वस्तूच्या दिशेने वाट काढत चालू लागला. जमिनीवर सगळीकडे लेसर किरणांचं जाळं पसरलेलं होतं. अतिशय सावधगिरीने तो हे लेसर किरणांचे अडथळे चुकवत होता. कॅमेऱ्यांच्या कक्षेत न येणारा आणि शिवाय लेसर किरणांचं जाळंही चुकवणारा मार्ग त्यानं आधीच ठरवून ठेवला होता. अर्थातच हे काम अत्यंत अवघड होतं, पण आधीपासूनच कितीतरी दिवस अतिशय संयमाने त्यानं याचा सराव केला होता.

जी वस्तू मिळवण्यासाठी एवढी धडपड चालू होती, त्या वस्तूपाशी तो येऊन पोचला. ती वस्तू एका काचेच्या पेटीत बंदिस्त करून ठेवलेली होती. ती वस्तू म्हणजेच सुप्रसिद्ध सायरस सिलेंडर. सुमारे २६०० वर्षांपूर्वी पर्शियाच्या अवाढव्य साम्राज्यावर राज्य करणाऱ्या त्या महान सम्राट सायरसच्या आज्ञेनुसार त्या सिलेंडरवर जाहीरनाम्याचे शब्द कोरलेले होते.

त्या सुरक्षारक्षकानं आपल्या मोबाइलवर काही आकडे एका विशिष्ट क्रमाने दाबले. त्यामुळे त्या वस्तूवर केंद्रित झालेला कॅमेरा फक्त साठ

सेकंदांसाठी बंद पडला. त्यानं त्याच्या बॅगमधून, मजबूत काच सहजगत्या कापणारा डायमंड कटर बाहेर काढला. काचेच्या पेटीवर जिथे कापायचं ठरवलेलं होतं त्या जागी त्यानं, हवा शोषून पृष्ठभागावर पटकन घट्ट चिकटून बसणारा, सक्शन कप बसवला. जलद गतीनं पण अतिशय पद्धतशीरपणे त्यानं कटरच्या साहाय्यानं सक्शन कपच्या भोवताली काच कापायला सुरुवात केली. काच सगळीकडून एकसारखी गोलाकार कापली जाईल याची पुरेपूर दक्षता तो घेत होता. त्यानंतर कापलेल्या काचेचा गोलाकार तुकडा त्यानं सक्शन कपच्या साहाय्याने उचकटून काढून घेतला आणि तयार झालेल्या भोकात हात घालून सायरस सिलेंडर हातात घेतला आणि तेवढ्यात...

"ए... तू रे!" अचानक दालनाच्या दुसऱ्या बाजूकडून आरोळी ऐकू आली. चोर जागच्याजागीच गोठल्यागत थबकला आणि तोंडातल्या तोंडातच त्यानं एक शिवी हासडली. सुरक्षेसाठी वापरलेल्या सर्वोत्तम दर्जाच्या तंत्रज्ञानाचे अडथळे चुकवणं मोठ्या मुश्किलीनं जमवलं होतं त्यानं आणि आता ह्या क्षुल्लक मानवी व्यत्ययामुळे सगळी मेहनत व्यर्थ ठरणार होती. खरं तर एरवी या वेळेला त्या भागात कुणीही नसायचं... पण मर्फीचा नियम! त्यानं प्रयत्नपूर्वक आपलं सगळं लक्ष हाती घेतलेल्या कामावर केंद्रित केलं. तो सिलेंडर जेमतेम तीस सेंटिमीटरपेक्षाही कमी लांबीचा होता. हलक्या हाताने त्यानं तो सिलेंडर उचलून आपल्या बॅगमध्ये ठेवून दिला आणि तो आवाजाच्या दिशेनं गर्रकन वळला.

"काय करतो आहेस रे तू इथे?" एक सुरक्षारक्षक बाई त्याच्या दिशेनं धावत येत ओरडली. तोदेखील तिच्यासारखाच एक सुरक्षारक्षक आहे, हे लक्षात येताच तिला आश्चर्याचा धक्का बसला. त्याच्या दिशेनं धावत येताना जमिनीवरच्या लेसर किरणांच्या जाळ्यावर तिचे पाय पडले आणि त्यामुळे धोक्याची सूचना देणारी कर्णकर्कश घंटा वाजू लागली.

आता चोराच्या लक्षात आलं, अटीतटीच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी उपायही तसेच हवेत. त्यानं पटकन कमरेला अडकवलेलं कोल्ट १९११ हे पिस्तूल काढलं आणि धावत येणाऱ्या त्या बाईवर रोखलं. त्यानं याआधी हे पिस्तूल कधीच वापरलं नव्हतं. पिस्तुलाचा चाप खेचण्याआधी तो अगदी क्षणभर थांबला आणि मग विचार न करता त्यानं गोळी झाडली. ती गोळी

त्या बाईच्या पोटात लागल्यामुळे तिच्या पोटातून रक्त उफाळून बाहेर येऊ लागलं आणि ती जमिनीवर कोलमडून पडली.

चोरानं पूर्वेकडील जिन्याच्या दिशेनं धूम ठोकली, आता तो कॅमेऱ्यांकडे, लेसर किरणांकडे मुळीच लक्ष देत नव्हता. जिन्यावरून दडादडा उतरून तो ग्रेट कोर्टमध्ये आला आणि संग्रहालयाच्या मॉन्टेग्यू प्लेस द्वाराच्या दिशेनं त्यानं धाव घेतली. आता काही क्षणातच बाह्य भागातली सुरक्षाव्यवस्था सक्रिय होईल, हे त्याला माहीत होतं. बाह्य सुरक्षाव्यवस्था सक्रिय झाल्यावर त्याचा इलेक्ट्रॉनिक पास निरुपयोगी होईल, हेही त्याला माहीत होतं. त्यामुळे तो जीव खाऊन धावत सुटला आणि सुरक्षाव्यवस्था सक्रिय होण्यास फक्त काही सेकंदांचाच अवधी शिल्लक असताना तो बाहेर पडला.

बाहेर त्याच्यासाठी एक मोटरसायकल उभी होती. तो त्यावर स्वार झाला आणि लंडनच्या ओलसर धुक्याने भारलेल्या काळोखात त्याची मोटरसायकल रोरावत निघून गेली.

२

चार घुसखोर तिच्या घरात शिरून लपून बसले आहेत, ही गोष्ट तिला अजिबातच माहीत नव्हती; अज्ञानात सुख म्हणतात... तसंच काहीसं.

रात्री झोपताना तिनं तिच्या आय-फोनमध्ये सकाळचा गजर लावून ठेवला होता. गजर म्हणून तिनं हार्प या वाद्याची धून तिच्या फोनमध्ये सेट करून ठेवलेली होती. सुरुवातीला गजर हलक्या आवाजात वाजू लागला आणि हळूहळू गजराचा आवाज वाढत गेला. लिंडा चुळबुळत जागी झाली. तिनं फोनमध्ये पाहिलं. सकाळचे सहा वाजले होते.

पलंगावरची जिमची झोपायची जागा, तिथे कुणी न झोपल्यागत, रिकामी होती. तिला जरा नवलच वाटलं. ती पलंगावरून खाली उतरली, तिनं शरीराला आळोखेपिळोखे दिले आणि एक दीर्घ श्वास सोडून ट्रॅकसूट चढवला, शूज घातले. त्यानंतर तिनं रात्री वाचत असलेलं पुस्तक उचललं. ते पुस्तक होतं, उमर खय्यामच्या रुबायांचा फिट्झजेराल्ड यांनी केलेला अनुवाद. सकाळची नेहमीची कामं आटोपून हे पुस्तक परत करायचा तिचा विचार होता. ती त्यांच्या मास्टर बेडरूममधून बाहेर आली.

लेक युनियन सरोवराच्या काठी असलेलं त्यांचं ते पाच बेडरूम्सचं घर अगदी चित्रवत सुंदर होतं. सिॲटलमधल्या सर्वोत्तम भागापैकी एक होता

तो. बाहेरून पाहिल्यास ते देवदाराचं लाकूड वापरून बनवलेलं घर वाटत होतं, पण आत मात्र आधुनिक सजावटीचं, मोजकं सामान असलेलं घर होतं ते. पॉलिश करून गुळगुळीत केलेल्या कॉन्क्रीटच्या फरशा, दिवाणखान्याच्या मध्यावर बसवलेली स्टेनलेस स्टीलची गोलाकार फायरप्लेस किंवा शेकोटी, मोठमोठ्या काचा बसवलेल्या भल्यामोठ्या खिडक्या... त्या खिडक्यांमधून बाहेर पाहिल्यावर नयनरम्य लेक युनियन दिसत असे, त्यात तरंगणाऱ्या बोटी दिसत असत.

सकाळी लवकर उठून एक तास योगाभ्यास आणि तीस मिनिटं पोहण्याचा व्यायाम करण्याची लिंडाची सवय होती. त्यानंतरच ती दिवसभराच्या इतर कामांना सुरुवात करत असे. अर्थात, व्यायामाला सुरुवात करण्याआधी ती जिम आणि तिच्यासाठी कॉफी बनवत असे. हवाईयन कोना कॉफी त्या दोघांची आवडती होती. अगदी त्यांच्या प्रणयाराधनेच्या काळापासून हे त्यांचं जणू नित्यकर्म बनलं होतं आणि त्यात कधीही खंड पडला नव्हता.

तिची चाळिशी उलटून गेली असली, तरीही तिची शरीरयष्टी मात्र एखाद्या पौगंडावस्थेतल्या मुलीसारखी कमनीय होती. अर्थात, ती नित्यनेमाने व्यायाम करून स्वत:ची काळजी घेत असल्यामुळे त्यात काही नवल नव्हतं. त्यात भर म्हणजे तिचे तेजस्वी डोळे, गालांवर पडणाऱ्या खळ्या, सोनेरी चमकदार केस... पहिल्या भेटीतच जिम दस्तूर या सगळ्या गोष्टींच्या प्रेमात पडला होता आणि लग्नाला वीस वर्षं होऊन गेली असली, तरीही त्याचं तिच्यावरचं प्रेम अजूनही तितकंच उत्कट होतं.

लिंडा जिमच्या अभ्यासिकेकडे गेली. 'कदाचित रात्रभर टेबलापाशी बसून काम केलं असेल'... तिच्या मनात आलं. पण अभ्यासिकेत कुणीही नव्हतं. तिनं पटकन फोनमधले मेसेजेस पाहिले. साधारण मध्यरात्रीच्या सुमाराला जिमचा संदेश आला होता, पण तेव्हा तिला गाढ झोप लागलेली होती. तो रात्रभर प्रयोगशाळेत काम करून सकाळी नाश्त्याच्या वेळेला घरी येईल, असं त्यानं तिला कळवलं होतं.

एक नि:श्वास टाकून कोना कॉफी बनवण्यासाठी ती स्वयंपाकघरात गेली. तिला उमर खय्यामचा सल्ला आठवला, 'ह्या आत्ताच्या क्षणी तुम्ही आनंदी रहा, हा क्षण हेच तुमचं आयुष्य आहे.' लिंडा कॉफी बनवण्यात गढून गेली. झेन बुद्धिस्ट साधू बऱ्याच वेळा साधं चहा बनवण्याचं कामसुद्धा

एखाद्या समारंभांसारखं साजरं करतात; त्यायोगे कायापालट होईल आणि सजगता निर्माण होईल असा त्यांचा विश्वास असतो. असं केल्यामुळे, मातीच्या चुलीत जळणारं लाकूड, आग, धातूच्या किटलीत उकळणारं पाणी, चहा ह्या सगळ्या घटकांच्या परस्परावलंबित्वाचं निरीक्षण करणं तुम्हाला भाग पडतं. तो क्षण सर्वार्थानं जगणं महत्त्वाचं.

तिच्या फोनमधला गजर वाजून बंद व्हायच्या अर्धा तास आधी, काळ्या रंगाच्या दोन टोयोटा-आरएव्ही४ ह्या चारचाकी गाड्या, त्यांच्या आवाराच्या मेन गेटवर बसवलेल्या बायोमेट्रिक प्रणालीला सहज चकवा देऊन, आत आल्या होत्या. गाडीतल्या एका माणसानं रबरी हातमोजा घातला होता आणि त्या हातमोज्याच्या बोटावर अंगठ्याचा त्रिमितीय ठसा कोरून घेतलेला होता. त्या ठशामुळे बायोमेट्रिक प्रणालीनं त्यांना आत प्रवेश दिला, मेन गेट अलगद उघडलं. दोन्ही गाड्या शांतपणे आत आल्या आणि आवारात येऊन थांबल्या. चार माणसे त्या एसयूव्ही गाड्या उघडून बाहेर आली. त्यांच्या अंगावर गडद निळ्या जीन्स, काळ्या रंगाचे टोपीवाले टीशर्ट्स, बूट, हातमोजे आणि फक्त डोळे आणि ओठ उघडे असणारी, पूर्ण डोकं, चेहरा झाकणारी, लोकरीची माकडटोपी असे कपडे होते.

त्यातला एक जण लगेच कामाला लागला... घराच्या मुख्य दरवाजावर संगणकचलित सुरक्षा-प्रणालीचं कंट्रोल पॅनेल होतं. त्याद्वारे सुरक्षा-प्रणाली सक्रिय किंवा निष्क्रिय बनत असे. तो माणूस सराईतपणे काम करत होता. गेले अनेक दिवस त्या लोकांचा चमू, उच्च दर्जाच्या ड्रोन्सचा वापर करून, संपूर्ण भागाचं बारकाईनं निरीक्षण करत होता. त्यामुळे आत प्रवेश मिळवण्यासाठी, सुरक्षा-प्रणाली कशी निष्क्रिय करायची ते त्यांना चांगलंच समजलं होतं. कंट्रोल पॅनेलवरची योग्य ती बटनं दाबून सुरक्षा-प्रणाली निष्क्रिय करण्यात तो माणूस यशस्वी झाला आणि ‘बीप’ असा हलकासा आवाज होऊन दरवाजा उघडला.

ते चारही लोक घरात शिरले. चहूबाजूंना शोधाशोध करू लागले... दिवाणखान्यात, बेडरूम्समध्ये... लिंडा झोपत असलेली मास्टर बेडरूम तेवढी वगळून बाकी सगळीकडे. ते तिच्या बेडरूममध्ये शिरणारच होते, पण तेवढ्यात तिचा गजर वाजू लागला होता. लिंडा बेडरूमच्या बाहेर आली, तेव्हा ते लोक तिच्या खोलीच्या बाहेरच होते... ती बाहेर येताच ते

जवळच्याच गेस्ट-बेडरूममध्ये लपून बसले होते. ही गेस्ट-बेडरूम जिमच्या अभ्यासिकेशेजारी, अगदी लागूनच होती.

स्वयंपाकघरात लिंडानं कोना कॉफीची दळलेली पावडर फिल्टर-कपमध्ये घातली आणि त्याच्यावर पाणी ओतलं. जराशा अनास्थेनंच ती फोनमधील बातम्या, इतर सूचना बघू लागली. जरी तिचं लक्ष फोनमध्ये गुंतलेलं होतं, तरी तिला डोळ्याच्या कोपऱ्यातून किंचितशी हालचाल जाणवली.

मात्र ही गोष्ट तिच्या लक्षात यायला बराच उशीर झाला होता. ती काही प्रतिक्रिया देण्याआधीच ते लोक स्वयंपाकघरात घुसले.

त्यातल्या दोघांनी तिला दोन बाजूंनी पकडलं. तिचा कॉफीचा कप जमिनीवर धाडकन आदळला गेला. स्वयंपाकघराच्या ओट्याशी तिला घट्ट जखडून धरलं. तिसऱ्या माणसानं तिचे हात मनगटांपाशी घट्ट बांधले आणि तिच्या तोंडावर चिकटपट्टी चिकटवली. तिच्यावर पूर्ण ताबा मिळवला त्यांनी... घाबरून गेल्यानं ती डोळे गोल गोल फिरवून इकडे तिकडे बघू लागली. तिचा फोन जमिनीवर पडला, पण त्याच्यावरचं आवरण चांगलं मजबूत असल्यामुळे तुटला मात्र नाही.

कुठल्याही साधारण अपहरणकर्त्याशी तिनं चांगलाच लढा दिला असता... तिची तंदुरुस्ती आणि ताकद होतीच तशी; पण हा मात्र अगदीच एकतर्फी लढा होता. तरी पाय बांधलेले नसल्यानं तिनं एका अपहरणकर्त्याला लाथा मारल्या. तिची लाथ त्याच्या गुप्तांगावर बसल्यामुळे तो वेदनेनं कळवळला पण लगेच सावरला. तिच्यावर झेपावताना त्याचा टीशर्ट ओव्हनच्या जाळीत अडकून फाटला. काही क्षणातच ती स्वयंपाकघराच्या जमिनीवर आडवी पडली... ती जमेल तसा संघर्ष करत होती, पण अगदीच हतबल झालेली होती. त्या झटापटीत लिंडाच्या उजव्या पायाला जखम झाली आणि रक्त वाहू लागलं. जमिनीवर रक्त सांडलं. नशिबानं जखम अगदी वरवरचीच होती.

एक अपहरणकर्ता तिच्या डोक्याजवळ उभा राहिला आणि त्यानं ग्लॉक जी१९ पिस्तुल तिच्यावर रोखलं. दुसऱ्या माणसानं खाली वाकून पटकन तिच्या दंडात प्रोपोफॉलचं इंजेक्शन टोचलं. त्या इंजेक्शनमुळे तिची शुद्ध हरपणार होती. इतर दोघे पटापट घरभर काहीतरी शोधू लागले, त्यांना जे हवं होतं, ते त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचं असावं असं वाटत होतं. विशेषतः जिमच्या अभ्यासिकेवर त्यांचं लक्ष एकवटलं होतं. त्याच्या

फाइल्स बारकाईनं तपासून झाल्या, ड्रॉवर्स, कपाटं, डेस्कटॉप... सगळं अगदी पिंजून काढलं.

मग एकजण म्हणाला, ‘‘इथे नाहीये ते, मला वाटलंच होतं तसं. आता आपल्याला हिला घेऊन जावं लागेल.’’ हे ऐकून भीतीनं लिंडाचे डोळे विस्फारले. तिचं अपहरण करण्याचा मनसुबा होता त्यांचा... ‘घरावरचा नुसताच अयशस्वी, साधासुधा दरोडा नाहीये हा’... तिच्या मनात आलं; पण आता प्रोपोफॉलच्या इंजेक्शननं परिणाम दाखवायला सुरुवात केली होती. तिची शुद्ध हरपत चालल्याचं तिच्या लक्षात आलं होतं.

लिंडाचा फोन वाजला. तिच्यावर पहारा ठेवून असलेल्या दरोडेखोरानं हातमोजे घातलेल्या हातानं फोन उचलला. जिमनं तिला मेसेज पाठवला होता. तो आता प्रयोगशाळेतून निघणार आहे, असं त्यानं कळवलं होतं. प्रयोगशाळेपासून घरापर्यंत गाडीनं यायला दहा मिनिटं लागतात, हे त्या अपहरणकर्त्यांना माहीत होतं. आता इथून लगेच निघून जायला हवं होतं.


दोन माणसांनी बेशुद्ध लिंडाला झटकन उचलून उभं केलं आणि तसंच अर्धवट उचलून चालवत, ढकलत तिला बाहेर उभ्या असलेल्या SUV गाडीपाशी नेऊन गाडीत ढकललं. इतर दोघांनी, जिमचे कागद, फाइल्स, यूएसबी मेमरी स्टिक्स आणि त्याच्या कॉम्प्युटरमधली हार्ड ड्राईव्ह असं काहीबाही सामान एका लहानशा हॅवरसॅकमध्ये भराभर भरून टाकलं. हे सगळं ते नंतर बघणार होते. दुसऱ्या आरएव्ही४ गाडीच्या मागच्या भागात त्यांनी ती हॅवरसॅक ठेवली.

घराचा दरवाजा लावून घेऊन ते चार लोक दोन गाड्यांमध्ये विभागून बसले. एका गाडीच्या मागच्या सीटवर बेशुद्ध झालेली लिंडा झोपली होती. तिचे हात-पाय बांधले होते, तोंडात बोळा कोंबलेला होता आणि आता तर तिच्या डोळ्यांवर पट्टीदेखील बांधली गेली होती. ते लोक कधीही कुठलाही धोका पत्करत नसत. गाडीच्या खिडक्यांच्या काळ्या काचा बाहेरून अपारदर्शक होत्या, त्यामुळे बाहेरून आतलं काहीही दिसत नसे. ते लोक एखाद्याला ओलीस म्हणून पकडून घेऊन जात असल्याचं कुणालाही मुळीच दिसलं नसतं.

त्यांना हवं ते मिळवण्याचा त्या लोकांनी निर्धारच केला होता आणि त्यांच्यासाठी लिंडा म्हणजे ते मिळवून देणारं साधन होती.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# अमीर खुसरो

**मिलिंद तेजराव जाधव**

काव्य आणि शासकांच्या इतिहासाचा अनोखा संगम साधत शेकडो वर्षं भारतीय साहित्यावर प्रभाव टाकणाऱ्या महाकवीची दास्तान...

**दि**शा उजळल्या. तलम हवेच्या रेशीमस्पर्शाने दिल्लीला जाग आली. कोवळ्या उन्हाची उधळण करीत सूर्य वर सरकू लागला. चार-दोन पाणके आपल्या खांद्यावर पखाली सावरत हमरस्त्यावर निघाले. तुडुंब भरलेल्या त्या कातडी पिशव्यांचं तोंड सोडून रस्त्यावर पाणी शिंपडू लागले.

२ ५

दिल्लीतल्या ‘दारे-सरा’कडे जाणारा हा शाही रस्ता. तेव्हा त्याची निगा काटेकोरपणे राखली जाई. मातीचा गंध हवेत उठला आणि आहिस्ता आहिस्ता रहदारी वाढू लागली. रस्ता गजबजू लागला.

कुणी सजवलेल्या घोड्याची वा सांडणीची सवारी करत आपल्या शानोशौकतचा ताठा मिरवत हजार सतूनकडे निघाले होते, तर कुणी गुलामांच्या खांद्यावरून धिमे धिमे धावणाऱ्या डोले-पालख्यांमधून आपला औदा, रुतबा यांचा धाक दाखवत पुढे सरकत होते. जामानिमा केलेले लहान-मोठे असे सारेच दरबारी आपापल्या परीने दरबार जवळ करीत होते.

उंच प्राचीरमधल्या भव्य दरवाजासमोर घोडे, उंट थांबू लागले. पालख्या जमिनीवर टेकू लागल्या. पायउतार होऊन शाही पुरुष दरवाजाच्या दहलीजकडे चालू लागले. दहलीजवर हत्यारबंद हशमांचा पहारा कायमच. बाजूच्या चबुतऱ्यावर नफीरी अर्थात शहनाई, नगाडे आणि सरना नामक वाद्यं वाजवणारी माणसं बसलेली. तशी ती आताही होती. दारे-सराकडे जाणाऱ्या माणसाची नजर मुख्य दाराकडे वळण्याआधी समोरच्या चबुतऱ्यावर हमखास जाई. मृत्युदंडाची अंमलबजावणी होण्याचं हे ठिकाण. मृतकाचे मुंडके तीन दिवस या भव्य दरवाजावर लटकत राही.

प्रथम क्रमांकाच्या दरवाजातून अमिरांचा प्रवेश होताच सनई-चौघडा वाजू लागला. त्याच्या आगमनाची सूचना देणारा पुकारा झाला. आत मोकळ्या परिसरात चैतन्यानं सळसळणारी झाडं, फुलझाडं ओळीने उभी होती. थोडं चालत गेलं की दुसरा तट. दुसऱ्या क्रमांकाचा दरवाजा. त्याच्या दहलीजवर पहिल्या दाराप्रमाणेच आत येण्याऱ्या अमीर-उमरावाचा नामघोष सनई-चौघड्याच्या संगतीने पुनरुच्चार करण्याचा रिवाज. इथेही पहाऱ्यावर धिप्पाड देहाचे पहारेकरी. दहलीजला लागून शेजारीच मोठा चबुतरा. ज्यावर नकीबुल नक्शा अर्थात घोषणा देणारा बसलेला असतो. हाती स्वर्णदंड आणि डोक्यावर सोनेरी रत्नजडित पगडी. पगडीत मोरपीस खोवलेले. साथीला असलेल्या अन्य नकीबांच्या कमरेला सोन्याची पेटी, डोक्यावर सोनेरी पगडी आणि हातात सोन्याच्या किंवा चांदीच्या मुठी असलेले आसूड.

दुसरा दरवाजा ओलांडून आत आलं की नजरेत भरतो तो एक दिवाणखाना. ज्यात साधारण अवाम येऊन बसते. दिवाणखान्याच्या पलीकडे तिसरा दरवाजा आहे. त्या दारावर मुत्सद्दी बसतात. कुणालाही ते आत

प्रवेश देत नाहीत. ज्यांचं नाव त्यांच्या चोपडीत आधीच नोंदलेलं असेल अशांनाच फक्त प्रवेश. प्रत्येक अमीर आणि त्यांच्या अनुयायांची संख्या ठरलेली, आणि ती या चोपडीत नोंदवलेलीसुद्धा आहे. मुत्सद्दी आपल्या रोजनाम्यात कोण अमीर आला आणि त्याच्या सोबत किती लोक होते त्याची काटेकोर नोंद ठेवतात. इशाची नमाज झाल्यावर रोज रात्री सुलतान स्वत: रोजनामचांचे निरीक्षण करतो. दारावर ज्या ज्या घटना घडल्या त्याचा उल्लेखही अनिवार्य असतो.

तिसऱ्या दरवाजातून आत गेलं की विस्तीर्ण मैदान. मैदानात ‘हजार सतून’ नावाचा दिवाणखाना दिमाखात उभा. दिवाणखान्याचं काष्ठांचं छत कवेत मावणार नाही, एवढाल्या हजार खांबांनी तोलून धरलेलं. त्यावरूनच याला नाव मिळालं ‘हजार सतून’. स्तंभांवरच्या कोरीव कामातून कारागिरांचं कौशल्य नजरेत भरतं. छतांवर रंगवलेली चित्रं मन वेधून घेतात. पण हे सारं नेहमीचंच म्हणून कौतुकानं कुणी पाहत नाही.

एकेक करत सारे अमीर, उमराव ‘हजार सतून’ मध्ये उपस्थित होऊ लागले. पलीकडे चौथा आणि पाचवा दरवाजा होता. पाचव्या दरवाजानंतर सुलतानांचा महाल.

दिवाणखान्यात एका कडेला, मध्यावर पुरुषभर उंचीचं मखमली कापड अंथरलेलं तख्त होतं. डावी-उजवीकडे तक्के. पाठ टेकवण्यासाठीचा तखिया त्याहून मोठा. सारे जण अदबीने आपापल्या जागी उभे झाल्यावर ललकारी झाली. बिरुदावलींसहित सुलतानाचे नाव पुकारले गेले. दरबारात सुलतानांचे कदम पडताच सारे दरबारी कमरेत झुकू लागले. मुजरे झडू लागले. दिवाणखान्याच्या मध्यातून मखमली पायघड्यांवरून दमदार पावलं टाकत ठेंगण्या अंगकाठीचे वयोवृद्ध सुलतान गियासुद्दीन बलबन धिम्या चालीने तख्ताच्या पायथ्याशी आले. पायऱ्या चढून सावकाश तख्तापर्यंत गेले. तशरीफ ठेवण्याआधी दरबाराच्या दिशेने वळले. समोर नजर टाकली. तख्ताच्या पायऱ्यांपासून थोड्या अंतरावर नायब वजीर उभा होता. त्याच्या मागे लेखनिक. त्यानंतर हाजिबांचा सरदार आणि हाजिब उभे होते. सुलतानाचा रिश्तेदारच सहसा हाजिबांचा सरदार असतो. हाजिबांच्या मागे नायब हाजिब, त्याच्या मागे विशेष हाजिब. त्यांच्या मागे विशेष हाजिबचा नायब, वकील उद्दार आणि त्याचा नायब शरफ उल् हज्जाब व त्याच्या मागे शंभर नकीब

उभे होते.

नमाजाच्या वेळी बसतात त्याप्रमाणे गुडघ्यात पाय मुडपून सुलतान गियासुद्दीन बलबन तख्तावर बसले.

''बिस्मिल्लाह!'' हाजिब आणि नकीब यांच्या तोंडून एकसाथ शब्द बाहेर पडला.

सुलतानच्या मागे उभे दोन सेवक चवऱ्या ढाळू लागले. ढाल-तलवार व धनुष्य घेतलेले शंभर शंभर सैनिक तख्ताच्या डाव्या-उजव्या बाजूला तैनात होते तर उरलेले दिवाणखान्यात डाव्या-उजव्या हाताला उभे झाले. नंतर काजी उल् कुज्जात आणि त्यांच्या मागे खतीबउल खुतबा. मग शेख, नंतर सुलतानच्या नात्यातील अत्यंत घनिष्ठ पुरुष व त्यांच्या मागे मोठमोठे अमीर, उमराव नंतर राजदूत व त्यांच्या मागे सैन्याधिकारी उभे होते.

सगळ्यांनी सुलतानास सिज्दा केला.

या सगळ्यांच्या मागे काळ्या, सफेद रेशमाचे लगाम घातलेले, दागिन्यांनी मढवलेले साठ उमदे घोडे फुरफुरत होते. त्यांच्या पाठीवर जीन आवळलेले असत. अर्धे उजव्या हाताला, अर्धे डाव्या. त्यांची सवारी सुलतानाखेरीज अन्य कुणासही करता येत नसे.

त्यानंतर सोन्याच्या तारांची कलाकुसर असलेल्या रेशमी झुली पाठीवर टाकून सजवलेले एकामागून एक हत्ती आले. त्यांची संख्या पन्नास होती. त्यांच्या लांब सुळ्यांवर लोहस्त्राण चढवले होते. त्यांचा उपयोग गुन्हेगाराला सजा-ए-मौत देण्यासाठी केला जायचा. मानगुटीवर माहूत बसलेले. माहुतांच्या हातात लोखंडी अंकुश, ज्याला 'तबरजीन' म्हणतात. हत्तींच्या पाठीवर हौदे कसलेले.

हाजिबांच्या 'बिस्मिल्लाह' उच्चारणानंतर हत्तींनी लगेच नतमस्तक होऊन सुलतानास अभिवादन केलं. चीत्कार घुमले. नंतर त्या सगळ्यांना अवामच्या पाठीमागे अर्धे- अर्धे डाव्या-उजव्या बाजूला उभे केले गेले. एकेक जण समोर येऊन सिज्दा आणि पयबोस करू लागला, पुन्हा आपल्या जागेवर जाऊन खालमानेने उभा राहू लागला. सिज्दा करण्याबरोबर 'बिस्मिल्लाह'चा स्वर घुमू लागला. जेव्हा कोणी गैरमुस्लिम सुलतानास सिज्दा करायला पुढे येई त्या वेळी 'बिस्मिल्लाह'च्या जागी 'हिदाक् अल्लाह' म्हटलं जाई.

काही लोकांनी सुलतानास तोहफे नजर केले. मौलवींनी कुरानशरीफ,

तसबीहची माला, वस्त्र अशा प्रकारचे तर अमिरांनी हत्ती, घोडे, नायाब हथियार पेश केले. तोहफे कुबूल केल्यावर सुलतानानेही योग्य त्या व्यक्तींना खिलत प्रदान करून यथोचित सन्मान केला.

पंधरा-वीस नक्षीदार झरोक्यांच्या महिरपीतून देर-सवेरची शेकडो किरणं दरबारातल्या सुरूदार खांबांना स्पर्शून आता फर्शवर सांडू लागली. तिथून परावर्तित झाली आणि दाहीदिशा फाकली. त्या आसमानी रौशनीने तख्तनशीन वयोवृद्ध सुल्तान गियासुद्दीन बलबनच्या चेहऱ्यावर नूर आला. मस्तकावरील मुकुटातले हिरे माणकं झळाळून उठले. समोर मौलाना बुऱ्हानुद्दीन महमूद, नज्मुद्दीन अब्दुल अजीज, शेख सिराजुद्दीन अबूबकर, काजी रुक्नोद्दीन सामानवी, मौलाना बुऱ्हानुद्दीन बजाज, मौलाना कमालुद्दीन जाहिद, मौलाना शम्सुद्दीन ख्वारिज्मी, मौलाना फक्रूद्दीन नायब असे विद्वान सत्पुरुष अदब राखून उभे होते. त्यांच्या उपस्थितीने दरबारच्या शानोशौकतमध्ये चार चाँद लागले. अल्लाहचा अंश मानल्या जाणाऱ्या सुलतानच्या चेहऱ्यावर नेहमीचं गांभीर्य, तर डोळ्यांत हुकमत आणि धाक होता. हजार सतूनमध्ये अदबपूर्ण शांतता पसरली.

राजधानीचा कोतवाल कमरेत झुकून पुढे आला. गुडघे टेकवून सुलतानच्या पायाचे चुंबन घेऊन उठला. चार पावलं मागे सरून, हातावर हात बांधून म्हणाला,

''हुजूर, यंदा फसलची पैदावार चांगली आहे. अनाजस्वरूपात लगान जमा होत आहे. शाही गोदामं भरली आहेत, आता आणखी येणाऱ्या अनाजचं काय करायचं?''

आवाजातलं गांभीर्य आणि डोळ्यातला दरारा कायम ठेवून सुलतान म्हणाले,

''खत्तियाँ भर दो. मुश्किल वक्त में काम आएगा।''

सिज्दा करून कोतवाल चार पावलं मागे सरला. आपल्या जागेवर जाऊन उभा राहिला.

सुलतानची नजर वजिराकडे वळली. तिचा मतलब जाणून वजीरने पत्रव्यवहार सांभाळणाऱ्या दीवान-ए-इन्शाकडे दृष्टिक्षेप टाकला. दीवान-ए-इन्शा पदावर काम करणारा मंत्री अदब राखून पुढे आला. पयबोस आणि सिज्दा करून म्हणाला,

''मुलतानसे शहाजादा मोहम्मदकी डाक आयी है। पेश करने की इजाजत चाहता हूँ।''

सुलतानने हथेली उंचावून अनुमतीचा इशारा केला. अखबारनवीसकडून आलेली खबर मंत्री वाचू लागला. सुरुवातीचा मायना वगळून त्यातील महत्त्वाचे शब्द सगळ्यांनी कानात साठवले –

''.... पूर्वी मी मुलतानास तर भाईजान शहाजादा बुगरा खान समाना सांभाळून होतो, परंतु पाच सालाआधी आपणच बुगरा खानास बंगाल प्रांताची जिम्मेदारी दिल्यामुळे पश्चिमी सरहद्दीची जिम्मेवारी पूर्णपणे माझ्या शिरावर आली आहे. नुकताच तैमूरखाँने लाहोर, दिपाळपूर भागावर हमला केला. तो आम्ही परतून लावला. पण आता आणखी पुढे होऊन त्याला लढत द्यावी की सुभा सांभाळून जिथे आहोत तिथेच मोर्चे बांधून रहावं याबाबत ठोस निर्णय घेणं अवघड झालं आहे. तैमूरखाँला धुळीस मिळवण्यास आम्ही सज्ज आहोत तेव्हा सुलतानांचा मनोदय कळावा ही दरख्वास्त.''

दरबारात चैतन्याची लाट पसरली. सुलतान यावर काय हुकूम देतात त्याकडे सगळ्यांचे लक्ष लागले.

पण सुलतानच्या चेहऱ्यावरची रेषही हलली नाही. वीस वर्षं वजीर म्हणून आणि वीस वर्षं सुलतान म्हणून सल्तनत सांभाळणाऱ्या मुरब्बी शासकाला जणू ते अपेक्षितच होतं.

''दीवान-ए-इन्शा!'' सुलतानचा आवाज दरबारात घुमला.

''जी हुजूर!''

''शहजादेसे कहीए, की मंगोलोंको नेस्तनाभूत करे. तैमूरखाँ का वजूद इस दुनिया से मिटा दे। फतेह हासिल करके जल्द से जल्द खबर भिजवाए।''

सुलतान बोलत असताना त्यांच्या तोंडचे शब्द लेखनिकाच्या लेखणीतून झरझर उतरत गेले. दरबारी लोकांमध्येही उत्साह संचारला.

त्यानंतर सल्तनतीचे इतर किरकोळ मसले हातावेगळे करून दरबारचं कामकाज संपलं.

सुलतान तख्तावरून उठले. सारा दरबार एकसाथ कमरेत झुकला. सगळ्यांनी सिज्दा केला. नंग्या तलवारींच्या संरक्षणात वयाची ऐंशी गाठू लागलेले सुलतान आस्ते कदम निघून गेले.

हजार सतूनमधून बाहेर पडलेला शाही घुडस्वार राजधानीच्या तटबंदीत

सताड उघड्या भव्य अशा बदायू दरवाजाच्या रोखाने दौडत होता. डोक्यावर मंदील, कमरेला खोचलेली सुलतानी आदेशाची सुरळी... दरावाज्यानजीक पोहोचताच कायदे आवळून त्याने घोड्याची चाल धिमी केली. बदायू दरवाजातून बाहेर पडला आणि डाकचौकीत आला. अखबारनवीस तयारच होता. स्वाराने डाक पोहोचवणाऱ्या कर्मचाऱ्यास ज्याला बरीद म्हणतात- डाक दिली. जराही देर न करता बरीद बाहेर पडला. मुलतानच्या रोखाने दौडू लागला. एका हातात लांब काठी तर दुसऱ्या हातात लिखित कागदाची सुरळी. काठीच्या टोकाला तांब्याची घुंगरं. धावत्या पावलांशी जुळणारा घुंगरांचा लयबद्ध आवाज. अखबारनवीस धावत होता. अंगातलं सारं बळ एकवटून लांब लांब ढांगा फेकत होता. पुढची डाकचौकी म्हणजेच, 'दावह', क्षणाक्षणाने जवळ करत होता.

दूर दूर जाणाऱ्या पाठमोऱ्या हरकाऱ्याकडे घुडसवार डाकचौकीच्या महिरपीतून पाहत राहिला. पुढे मार्गावर दर एक तृतीयांश मैलावर गाव वसलेलं होतं. प्रत्येक गावाच्या बाहेर डाकचौकी. डाकचौकीत हरकारा कंबर कसून सदैव तत्पर. घुंगरांचा पुसटसा छन्छनाट दूरून कानी येताच पुढचा हरकारा होशियार होतो. जवळ येऊ लागलेल्या छन्छनाटासह नव्या हरकाऱ्याच्या अंगातलं रक्त सळसळू लागतं. दमगीर झालेला पहिला हरकारा कोसळून पडायच्या आत दुसरा त्याच्या हातून डाक घेतो अन् दौडू लागतो. पुढचं एक तृतीयांश मैल जल्द से जल्द पार करणे एवढाच त्याचा जिम्मा. अशा तऱ्हेनं दिल्ली ते मुलतान ही पन्नास दिवसांची राह हरकारे अवघ्या पाच दिवसांत उरकतात. या डाकेला 'बरीद' म्हणतात. दुसरी डाक घोड्याची. तिला 'औलाक' म्हणतात. यात प्रत्येक चार कोसांवर घोडा बदलला जातो. घोड्यांचा बंदोबस्त सरकारातून होतो.

हरकारा दिसेनासा होताच घुडसवार मागे वळला. बदायू दरवाजातून आत प्रवेशताच त्याची नजर धान्याची पोती लादलेल्या बैलगाड्या, उंटगाड्यांवर पडली. ती सारी दरवाजाच्या दिशेने येताना दिसली. सोबत बरेच गुलामही ओळीनं चालत होते. ते सारे जवळ आल्यावर चढ्या घोड्यावरूनच त्याने चाकराला विचारलं.

''ये सब कहाँ जा रहा है?''

''अनाज भरणं सुरू आहे. प्राचीरची खत्तियाँ भरण्याचा हुकूम आहे.''

“अच्छा।”

एवढं बोलून त्याने घोड्याला टाच मारली. घोडा दिडक्या चालीनं दौडू लागला. घुडस्वाराला आता तिथे थांबण्यात स्वारस्य नव्हतं. कारण त्याला अकरा हात रुंदीच्या तटबंदीत असलेल्या खत्तिया मालूम होत्या. तटबंदीत चौकीदारांसाठी जशा कोठ्या, घरं तशीच अनाज साठवण्यासाठी खत्तियाँ. प्राचीर म्हणजेच तटबंदी. तिचा खालचा भाग पत्थरांचा, तर वरचा पक्क्या विटांचा बनवलेला. बुरुजांची संख्याही भरपूर. शिवाय एकमेकांपासून कमी अतंरावर. अनेक रखवालदार रात्रंदिवस त्यावरून गस्त घालत असत. खत्तियेमध्ये रौशनी पोहोचावी म्हणून नगराच्या दिशेने रौशनदान बनवलेले. इथे ठेवलेलं अनाज हरप्रकारे सुरक्षित राहतं. कितीही वर्षं ठेवा, त्याचा रंग बदलत नाही की चव.


गुलामांकरवी गाड्यांमधलं अनाज खत्तियाँमध्ये नेलं जात होतं. पाठमोरा स्वार ऐटीत घोडा फेकीत दूर दूर चालला होता...

◆


**नवी संहिता... नवा आशय...**

# मोहरलेला चंद्र


**बाबाराव मुसळे**




ग्रामीण जीवनातल्या दैनंदिन घटनांमधून व्यक्ती आणि वल्लींच्या भावछटा मांडणाऱ्या दर्जेदार कथा

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून







## लक्ष्मीकांत देशमुख

*रशिया-युक्रेन युद्धभूमीच्या विशाल आशयपटलावर मानवी संवेदनांना आव्हान देणाऱ्या कथा*

### द ग्रेट डिक्टेटर

**ल**ष्करी गणवेशातल्या बुटक्या माणसाच्या हातात पृथ्वीच्या आकाराचा फुगा आहे. तो त्याकडे बुभुक्षित नजरेनं पाहत आहे. मध्येच आपला डावा हात छातीला लावत हसत आहे.

तो मग त्या फुग्याशी खेळत वेडंवाकडं नाचू लागतो.

नाचताना हातातून फुगा निसटतो आणि उडी मारून पकडताना तो फट् असा आवाज करीत फुटतो...

त्याच्या निराश चेहऱ्यात हिटलरचा व पुतिनचा चेहरा आळीपाळीनं दिसू लागतो... आणि या पार्श्वभूमीवर एक आवाज ऐकू येतो.

'माणसाच्या मनातील द्वेष अखेरीस संपून जाईल. हुकूमशहा एक दिवस मरून जातील आणि त्यांनी सर्वसामान्य माणसांच्या हातून जबरदस्तीने हिसकवलेल्या स्वातंत्र्याची सनद अखेर सर्वसामान्य माणसांच्या हातीच परत येईल! या युद्धात माणसे मरतील, मरत राहतील; पण स्वातंत्र्याचा कधीही अस्त होणार नाही, ते असेलच! असेलच!!'

❧

'येस, आय हॅव डन इट!'

मोबाइलवरचा तो तीन मिनिटांचा शॉट बार्बरानं पुन्हा एकदा पाहिला आणि एडवर्डला उत्स्फूर्तपणे मिठी मारली. त्या बंकरमध्ये त्यांच्यासारखीच वली व खलील ही स्नायपर टीमही आहे याचेही तिला भान राहिले नाही. ती उत्तेजित स्वरात पुटपुटली, 'जमेल, मला नक्की जमेल... चार्ली चॅप्लिनप्रमाणे मलाही आजच्या हिटलरएवढ्याच खतरनाक डिक्टेटरचा पर्दाफाश करणं जमेल...!'

''होय बेबी. यू कॅन डू एनी थिंग ॲन्ड एव्हरी थिंग.'' अजूनही ती त्याच्या मिठीत काहीतरी फार महत्त्वाचं साध्य केल्याच्या कलात्मक समाधानात होती. त्याचा फायदा घेऊन त्यानं थोडं धीट होत तिच्या ओठांचं चुंबन घेतलं व तिला मिठीतून मोकळं करीत म्हटलं, ''तू एक असामान्य स्त्री आहेस, बार्बरा...!''

आता ती भानावर आली होती. त्याचं प्रेमापेक्षा कौतुकाचं चुंबन तिला आवडलं होतं; पण त्यानं मैत्रीच्या सीमारेषेतच राहावं हा तिचा कटाक्ष होता. तो त्याला आज या क्षणी पुन्हा जाणवावा म्हणून तिनं आपल्या ओठांवरून जीभ फिरवून जणू त्याचा स्पर्श पुसून टाकला.

''ओ. नो. यू वोन्ट डू इट टु मी...'' काहीसा फुरंगटल्यासारखा पण चेहऱ्यावर मिस्कील भाव आणत कोरड्या स्वरात एडवर्ड म्हणाला, ''तुला मी मला फ्रेंड मानण्यापासून कधीच रोखणार नाही, मग मलाही त्यापासून

रोखू नकोस डिअर.''

''कशापासून?''

''ते पण सांगायला हवं?''

''हो. मी काही तुझ्यासारखी मनकवडी नाहीय एडी.'' ती कळूनही अनभिज्ञतेच्या आविर्भावात त्याची नजर चुकवत म्हणाली.

''ओ, कमॉन! तू एवढी मोठी कलावंत आहेस. आपल्या ब्राझील देशाची टॉप मॉडेल, ॲक्ट्रेस... आणि यंदाच्या कान्स फिल्म फेस्टिव्हलच्या ओपनिंग सेरेमनीला रेड कार्पेटवर पांढरा गाउन घालून खांद्यावर शुभ्र कबुतर घेऊन किती दिमाखात चालली होतीस. गाउनच्या पट्ट्यावर 'युक्रेनवरील युद्धाचा निषेध' अशी अक्षरं होती! खरं सांगू बार्बी, तू त्या क्षणी पूर्ण जगातील समस्त कलावंतांच्या मनातल्या मानवी करुणेचं प्रतीक झाली होतीस... आणखी शंभर वर्षानं पण कान्स फिल्म फेस्टिव्हलच्या इतिहासात हा क्षण सुवर्णाक्षरानं लिहिलेला राहील. कलावंत हा किती निखळ माणूस असतो, याचं समर्थ उदाहरण म्हणून. जगा आणि जगू द्या, हेच तर मानवी संस्कृतीचं सार नाही का?''

ती त्याच्या मनापासून आलेल्या प्रामाणिक प्रतिक्रियेनं स्तिमित झाली होती. तिला वाटू लागलं, 'त्याच्या डोळ्यात...नकोसं वाटतं.' त्याच्या डोळ्यांत व अवघ्या चेहऱ्यावर जे भाव प्रकट झाले आहेत, त्यात मैत्री तर आहे, एक कलावंत म्हणून आपणास केलेला सलाम आहे; पण त्याहून अधिक काही आहे. त्याच्यासाठी आपण खास आहोत, खूप महत्त्वाचे, मौल्यवान आहोत.

'टिपकागदासारखे आपल्या अस्पष्ट भावभावना पण नेमकेपणानं टिपून घेणाऱ्या त्याच्या मनकवड्या स्वभावाला आपला चेहरा दिसला तर तो मघासारखा पुन्हा थोडा अधिक धीट होईल... ते हवंसं वाटतंय आणि नकोसंही. आपल्या स्वच्छंद व स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला व जगण्याला अगदी समर्पित प्रेमाचं पण बंधन नकोसं वाटतं, म्हणून बार्बरानं त्याची नजर चुकवत मान खाली घातली.

क्षणभरानं त्याचा निराश सुस्कारा तिच्या कानी पडला; पण त्याच्याकडे पाहण्याची तिला हिंमत झाली नाही. मग तो झोपण्यासाठी बेडवर पडला आणि अंगावर ब्लँकेट ओढून घेत म्हणाला, ''गुड नाइट बार्बी! उद्या

सकाळी मिशनवर जायचं आहे आणि तुला उद्या तुझ्या फायरिंगचं कसब दाखवून तुझं युक्रेनला येणं व त्यांच्या स्नायपर युनिटमध्ये जॉइन होणं जस्टिफाय करून दाखवायचं.''

''येस माय फ्रेंड!'' बार्बरा पण आता त्याच्या बाजूच्या बेडवर पडली व कुशीत ठेवलेल्या एके-४७ वरून हात फिरवत त्याला म्हणाली, ''कुर्दिस्तानला आठ वर्षांपूर्वी पेशमर्गा वॉरिअर वुमन सोबत आयसिसशी लढले होते, तेव्हा प्लाटून प्रमुख लेफ्ट. कर्नल नाहिदा अहमदनं मला 'लेडी डेथ' असं संबोधलं होतं. मला उद्या त्या नावाला साजेशी कामगिरी पुन्हा एकदा करायची आहे. नाझींपेक्षाही हे रशियन सैनिक अधिक युद्धखोर व घृणास्पद - किळसवाणे आहेत. होय. दुसऱ्या देशाच्या स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्यांना दुसरं काय म्हणायचं? युक्रेनी माणसं किती शौर्यानं मरणाची तमा न बाळगत लढत आहेत. माझ्यासोबत तूही आलास त्यांना साथ द्यायला हे बरं झालं एडी...''

''मी आपल्या ब्राझील आर्मीचा प्राउड सोल्जर आहे; पण युद्ध हे कधीच कुठे होता कामा नये. या मताचा मी आहे. युद्ध फार भयंकर असतं बार्बी! पण जगातला शहाणा म्हणवून घेणारा माणूस पुन:पुन्हा का युद्धखोर होतो, जगावर युद्ध का लादतो, हे न उलगडणारं कोडं आहे...''

''एवढी प्रगती करूनही माणसाची पशुवृत्ती कायम आहे, त्याच्यासाठी बळी तो कान पिळी हेच अंतिम सत्य आहे...'' बार्बरा म्हणाली, ''जसे बुद्ध, येशू, गांधी मरत नाहीत, तसेच माणसांतले हिटलर, मुसोलिनी, चंगेजखान पण मरत नाहीत... त्या मानवी विकृती आहेत. आज युक्रेनवर अकारण आक्रमण करून रशियन प्रेसिडेन्ट पुतिननं दाखवून दिलं आहे की, हिटलर- नामक प्रवृत्ती पुन्हा जिवंत झालीय. म्हणून तर मी फिल्ममध्ये त्याचा चेहरा हिटलरवर सुपर इम्पोज केला... त्याच्या हातातला पृथ्वीसदृश फुगा फुटताना दाखवला...''

''फारच ब्रिलिअंट व प्रभावी ओपनिंग सीन झालाय...!'' एडवर्ड म्हणाला, ''मला तुझा असिस्टंट डिरेक्टर करून टाक बरं... तुला खूप छान युद्धदृश्ये शूट करून आणून देईन!''

''डन!'' बार्बी समाधानानं म्हणाली, ''ओके, गुड नाइट!'' आणि तिनं अंगावर रजई ओढली. डावा हात दूर करून दिवा विझवला. बंकरमध्ये

पूर्ण अंधार झाला; पण बार्बराचे डोळे सताड उघडे होते. त्या सभोवतालच्या अंधारात नजर काहीतरी पाहत होती व त्याचा अर्थ मनोमन लावत होती.

क्रौर्याचा व हिंसेचा गडद अंधार...

मनात उमटलेल्या उपमेनं ती काहीशी खिन्न झाली. आपलं एडवर्डसोबत ब्राझीलहून युक्रेनला येणं व स्नायपर युनिटमध्ये सामील होणं. रशियन सैन्याची महत्त्वाची माणसं मारणं, त्यांचे इंधनाचे टँक, वॉकीटॉकी आणि इलेक्ट्रॉनिक संपर्क यंत्रणा उद्ध्वस्त करणं म्हणजे अंधारात काठी मारून अंधाराला पळवून लावण्याचा निरर्थक प्रयास तर नाही? बलाढ्य रशियापुढे सर्वच बाजूने छोटा असणारा युक्रेन देश किती काळ तग धरू शकेल? आणि त्याच क्षणी तिला युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोडिमर झेलेंस्कीच्या कान्स फिल्म फेस्टिव्हलच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणाचा एक भाग आठवला. त्यांचे कणखर व भविष्यदर्शी बोल कानात घुमू लागले.

‘एव्हाना जगाला हे कळलं असेलही आणि हेही जगाला पक्कं माहीत असणार की, पृथ्वीवरच्या एका अख्ख्या खंडाला आपल्या जबड्यात ओढू पाहणारे युद्ध अनंत काळ सुरू राहूच शकत नाही. ते एक दिवस संपणार आहे. मानवता जिंकणार आहे.’

❧

प्रिय प्रेसिडेन्ट,

२०२२ च्या कान्स चित्रपट महोत्सवातील उद्घाटनाच्या प्रसंगी रेड कार्पेट एन्ट्रीची, तीही खास बनवलेल्या ग्लॅमरस पोशाखातील दिमाखदार प्रवेशाची माझी पहिली वेळ नव्हती, सर. तरीही ते धुंद ग्लॅमर, तारुण्य आणि स्त्रीदेह सौंदर्याचे ते उत्तेजक वातावरण मला हवेहवेसे वाटणारे होते. त्यामुळे ब्राझीलची एक स्टार मॉडेल व अभिनेत्री म्हणून मिळालेले रेड कार्पेट वॉकचे निमंत्रण मला नाकारणे शक्य नव्हते. मधल्या काही वर्षांत माझ्या मानवतावादी व प्राणी रक्षणाच्या कामामुळे कान्सला आले नव्हते. त्यामुळे यंदाची संधी मी सोडायची नाही म्हणून पूर्ण तयारीनिशी आले.

सर, आपण आज युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष आहात; पण एके

काळचे विनोदी अभिनेते आहात. द ग्रेट चार्ली चॅप्लिनच्या जातकुळीचे. तुम्हाला कान्स फिल्म फेस्टिव्हलचा स्टारस्टडेड रेड कार्पेट समारंभ नक्कीच माहीत असणार. मीही पूर्ण आत्मविश्वासाने हजारो कॅमेऱ्यांच्या फ्लॅशच्या लखलखाटात दोन्ही हातांनी फॅन्स व प्रेक्षकांकडे मादक हसत चुंबने फेकत माझे ग्लॅमरस व्यक्तिमत्त्व दाखवत शुभ्र गाउनमध्ये रेड कार्पेट वॉक पूर्ण केला. माझ्या खांद्यावर एक शुभ्र कबुतर होतं आणि पट्ट्यावर 'नो वॉर, ओन्ली पीस. आय सपोर्ट युक्रेन' अशा अक्षरांचा मजकूर होता. माझा सध्याचा दोस्त ब्राझीलचा सेनाधिकारी एडवर्ड माझ्यासाठी रजा घेऊन सोबत आला होता. त्याच्यासाठी हा सेलिब्रेटीजचा - खासकरून सुंदर सेक्सी ललनांचा सौंदर्य खजिना मनमुक्तपणे उधळला जाणारा रेड कार्पेट वॉक कल्पनेपलीकडचा होता. त्याच्या नजरेतला माझ्याबद्दलचा अभिमान आणि प्रेम-आसक्ती पाहून मला वाटत होतं की, खरंच मी ती दहा मिनिटं क्लाऊड नाईनमध्ये होते. स्त्री सौंदर्याचं, नटण्या-मुरडण्याचं सार्थक पुरुषांच्या कौतुकभिजल्या आसक्त नजरेमुळेच होत असतं ना!

मी ब्राझीलची एक लोकप्रिय व आघाडीची मॉडेल आहे. माझं भांडवल सर्वांत आधी आहे ते माझं रूप, माझी फिगर; पण माझ्या सामाजिक व मानवतावादी कार्यामुळे मला माझ्या देशात 'ब्यूटी वुईथ ब्रेन' असणारी प्रभावशाली व्यक्ती मानलं जातं. मला त्याचा सार्थ अभिमान आहे. अन्यायी जगात 'हॅव नॉट'ची व 'अंडर डॉग'ची बाजू घेत आजच्या ग्लोबलायझेशनच्या जगात पैसा आणि उपयुक्तता या दोनच चलनी नाण्याचा प्रभाव असताना अनाथ व रस्त्यावरील प्राण्यांसाठी काम करणं ही माझी ग्लॅमरच्या पलीकडची दुसरी प्रतिमा आहे व तिचा मला अभिमान आहे; पण ते प्रभावीपणे करण्यासाठी मला पैसा आणि सेलिब्रेटी स्टेटस रूप-ग्लॅमरचा शो बिझनेस देतो व तो पण मी तेवढाच एन्जॉय करते. मी सुंदर आणि मॉडेल म्हणून प्रेझेन्टेबल आहे आणि रुपेरी पडद्यावर रोमँटिक भूमिका करून प्रेक्षकांचं रंजन करणारी कलाकार आहे. हे माझं जीवनही मला तेवढंच प्रिय आहे. कान्स फिल्म

फेस्टिव्हलला जगातले उत्तमोत्तम सिनेमा पाहायला येणं आणि माझ्या सेलिब्रेटी स्टेटसला चार चांद लागणारा रेड कार्पेट वॉक घेणं मला आवडतं. ते ग्लॅमरस आणि धुंद वातावरण मी मन:पूत उपभोगते.

यंदाचा फिल्म फेस्टिव्हलही त्याला कसा अपवाद असणार? या ग्लॅमरस वातावरणात खरं सांगू सर, तुम्ही व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे फिल्म फेस्टिव्हलचं उद्‌घाटन करणार आहात, यापासून अनभिज्ञ होते; कारण ऐनवेळी तुम्हाला निमंत्रित केलं होतं म्हणून असेल. कुर्दिस्तानला पेशमर्गा स्त्री योद्ध्यासोबत फॅनॅटिक आयसिस या जगासाठी आपत्ती ठरलेल्या जहाल संघटनेविरुद्ध लढताना २०१४मध्ये मी मरता-मरता वाचले होते. त्यामुळे मनात मृत्यूची भीती घर करून राहिली होती. त्यामुळे असेल कदाचित, मागील आठ वर्षे मी फिल्म्स- मॉडेलिंगचं करिअर आणि प्राणी संरक्षणाच्या कामातच रममाण होते. त्यामुळे गेल्या महिन्यात २४ फेब्रुवारी, २०२२ ला तुमच्या युक्रेन देशाविरुद्ध महाबलाढ्य, साम्राज्यवादी वृत्तीच्या व विस्तारवादी धोरणाच्या रशियानं युद्ध सुरू केलं आहे व पर्यटक म्हणून मी पाहिलेलं किव्ह शहर आज जवळपास खिंडार बनलं आहे, हे मी अलिप्त थंडपणे वाचलं, पाहिलं होतं. तुम्हाला कान्सला फिल्म फेस्टिव्हलच्या उद्‌घाटनासाठी का बोलवलं असावं याचा अंदाज येत नव्हता. तुम्ही एकेकाळचे लोकप्रिय विनोदी अभिनेते आहात, हे मला जागतिक सिनेमाची बऱ्यापैकी जाण असतानाही माहीत नव्हतं, हे मी प्रांजळपणे मान्य करते.

पण सर, आपलं उद्‌घाटकीय भाषण ऐकलं आणि खाड्‌कन त्या मन गुंग-बधिर करणाऱ्या रेड कार्पेट वॉकच्या 'वाहवा' लुटणाऱ्या वातावरणातून बाहेर आले आणि मी फक्त 'स्कीन डीप ब्यूटी' असणारी रूपसुंदर तारका नाही, तर मानवी कला-संस्कृती पुढे नेणाऱ्या सिनेमा नामक महान जबाबदार व मानवाप्रति उत्तरदायी असणाऱ्या कलेची जबाबदार घटक आहे, याचं भान तुमच्या भाषणानी मला आलं सर. मी मनापासून सांगते की, कान्सच्या काय पण जगातील विविध महत्त्वाच्या चित्रपट महोत्सवातलं

जीवन व कलेचा अन्योन्य संबंधांवर भाष्य करणारं तुमचं आजचं भाषण भविष्यकाळात कायम स्मरणात राहील, एवढं विचारोत्तेजक होतं.

सर, एक प्रशिक्षित स्नायपर फायटर या नात्याने आधुनिक हुकूमशहा पुतिनच्या रशियन सेनेविरुद्ध तुमच्या देशाच्या शूर जनतेसोबत लढण्यासाठी मला परवानगी द्या, असं उद्घाटनानंतर हॉटेलमध्ये परतल्यानंतर मध्यरात्री हे विनंतिपर पत्र मोबाइलवर लिहीत आहे... माझ्या मनातल्या मृत्यूच्या भीतीवर मात करून लिहीत आहे.

सोबत काही लिंक्स पाठवत आहे, त्या उघडून पाहिल्या तर तुम्हाला समजून येईल की ही ब्राझीलची स्टार मॉडेल २०१४-१५ मध्ये आयसिस विरुद्ध कुर्दिस्तानच्या पेशमर्गा वुमन्स वॉरिअर बटालियन सोबत लढली होती; कारण आयसिस हे प्रतिगामी आहेत. स्त्रियांना शिक्षण नाकारून बुरख्याच्या काळोखात अवघं आयुष्य घराच्या चार भिंतींच्या आत जगायला प्रवृत्त करणारे आहेत. एक आधुनिक स्त्री म्हणून व स्त्री-पुरुष समता मानणारी माणूस म्हणून मला ते मान्य नव्हतं व नाहीय. अशावेळी त्यासाठी काही करणं ही माझी स्वाभाविक प्रेरणा होती, ऊर्मी होती. तिच्याशी प्रामाणिक राहून मी त्या लढ्यात दीड वर्षं कुर्दिश स्त्रियांच्यासोबत युद्ध लढत होते. तिथेच मी स्नायपरचं प्रशिक्षण घेतलं व धैर्यानं - शौर्यानं लढले. मला कुर्दिस्तानच्या पेशमर्गा सेनेच्या लेफ्टनंट कर्नल वहिदा अहमदनं 'लेडी डेथ' असं संबोधलं. त्या नावानं आजही गुगल सर्च केला तर मी किती आयसिसना मारलं व त्यांचे ॲसेट्स नष्ट केले, याच्या शेकड्यानं साइट्स समोर येतील. मला माझ्या शौर्याचा व केलेल्या कामाचा अभिमान आहे; पण तेव्हा एका जीवघेण्या हल्ल्यातून वाचले. त्यामुळे या आठ वर्षांत मी अफगाणिस्तानला मनात घर करून राहिलेल्या मरणाच्या भीतीमुळे तालिबान विरुद्ध लढण्यासाठी गेले नव्हते, हेही प्रांजळपणे कबूल करते; पण आज तुमच्या भाषणानं मी एवढी प्रभावित झाले आहे की मनातली भीती नाहीशी झाली आहे. म्हणूनच सर, आज मी

तुमच्या देशाच्या बाजूने आजच्या एका हुकूमशहाच्या बलाढ्य सेनेविरुद्ध लढण्यासाठी परवानगी मागत आहे आणि तुम्ही ती द्याल अशी आशा आहे.

मी हे पत्र लिहिण्यापूर्वी पुन्हा एकदा तुमचं भाषण यू-ट्यूबवर ऐकलं. सर, तुम्ही कलेचं मानवी जीवनातलं आणि सभ्य, आधुनिक जीवनातलं महत्त्व व स्थान ज्या तऱ्हेने उलगडून दाखवलंय, त्याला तोड नाही. ते तुम्ही चार्ली चॅप्लिनचं उदाहरण देऊन स्पष्ट केलं ते अत्यंत समयोचित आहे. म्हणून या पत्राने तुम्हाला शब्द देते की, ही बार्बरा 'द ग्रेट डिक्टेटर - पार्ट टू' नामक फिल्म बनवेल. युक्रेन युद्धाचा प्रत्यक्ष विध्वंस दाखवेन, तसेच सामान्य युक्रेनी माणसाच्या मनातल्या स्वातंत्र्याच्या ऊर्मीची व दिलेल्या लढ्याची कहाणी कथन करेन. माझ्यात अर्थातच महान चार्ली चॅप्लिनची प्रतिभा असणार नाही, हे उघड आहे; पण त्याची भरपाई प्रत्यक्ष युद्धभूमीवर लढून शूट करून करेन. आजच्या सोशल मीडियावरून मीम्ससारखी आधुनिक आयुधं वापरून मीही आजच्या हुकूमशहाला पडद्यावर हास्यास्पद करून टाकेन. तुमच्या देशाच्या उद्याच्या विजयात मीही माझ्या परीनं एक कलावंत व एक प्रशिक्षित स्नायपर फायटर म्हणून हातभार लावेन.

हे मी का करणार आहे? ते माझं कलावंत म्हणून कर्तव्य आहे, ज्याची मला पुन्हा नव्यानं तुमच्या एका सुभाषितवजा वाक्यानं जाणीव करून दिली आहे, जे मी उद्धृत करून हे पत्र पूर्ण करते सर!

'माणसांच्या मनातला द्वेष अखेर संपून जाईल. हुकूमशहा एक दिवस मरून जातील. स्वातंत्र्याची सनद पुन्हा सामान्य माणसाच्या हाती येईल! स्वातंत्र्याचा कधीच अस्त होणार नाही. ते असेल. असेलच!'

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# गुंजन

**भा. द. खेर**





भावनिक व व्यावहारिक आंदोलने अधोरेखित करणारी 'गुंजन!'

**किंमत : २४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# क्रांतिफुले

**भा. द. खेर**




देशस्वातंत्र्यासाठी तिघा बंधूंनी फासावर जाऊन
केलेल्या बलिदानावरील चरित्रात्मक ओजस्वी कादंबरी

**किंमत : ३४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




# रूम नंबर ३१२ आणि इतर कथा

अनुवाद : **सुनंदा अमरापूरकर**

*चुटूकदार कथानकात गुंतवून ठेवणारं*
*पिटुकसं रहस्य असणाऱ्या बहारदार कथा*

### स्टॅलो आणि वुलगारू, डॅश आणि सैतानाची मुलगी

– इस्टेराइन किरे

वुलगारू माणसानेच बनवले. एके काळी वुलगारू किंवा सैतानाचे सैतान नव्हतेच. पण एकदा एका माणसाला वुलगारू बनवायची तीव्र इच्छा झाली. तो अगदी झपाटूनच गेला त्या इच्छेने. मग त्याने लाकूड आणि काठ्या घेतल्या

आणि माणसाची आकृती तयार केली. त्या लाकडी माणसाचे हात आणि पाय म्हणजे काठ्याच होत्या. अगोदर तो निर्जीव होता.

मग तो माणूस काय करायचा, दररोज त्या लाकडी माणसापुढे एक गुप्त मंत्र म्हणायचा आणि लाकडी हाता-पायांवर एका काटकीने मारत यांच्यात जीव येऊ दे, जीव येऊ दे अशी इच्छा करायचा. पण काहीच घडायचं नाही. असं बरेच दिवस झाल्यावर तो माणूस वैतागला. त्याने हातातली काटकी दूर फेकली आणि चालू लागला.

तो फार लांब गेलाही नव्हता, तोच त्याला पाठीमागे कसला तरी विचित्र आवाज ऐकू यायला लागला. मोठ्या साखळ्यांचा खणखणाट आणि झाडं मोडल्यासारखा तो आवाज होता. त्याने मागे वळून पाहिलं, तर काय? त्याने बनवलेल्या लाकडाच्या माणसात खरोखर जीव आला होता आणि वाटेत येणारी झाडं कडाकडा मोडत तो आपल्या निर्मात्याकडेच यायला लागला होता. तो वुलगारूच होता.

त्याचा चेहरा इतका कुरूप होता, की त्याचं शब्दांत वर्णन करणं शक्य नाही.

मग तो माणूस पळायला लागला. पण वुलगारू त्याच्या मागे मागे, साखळ्यांचा खणखणाट करत येतच होता.

ते गावभागातून मैलोन्‌मैल वाळू तुडवत धावत सुटले. तांबड्या खडकांना पार करून दोघेही धपापत, धापा टाकत पळत होते. काही अंतरावर खुरटी झाडी आणि दलदल होती. तिथे तो माणूस वाकून लपून बसला. मागून येणाऱ्या वुलगारूने त्याला पाहिले नाही. तो आपला धावतच राहिला. जंगलापासून जवळच एक खेडेगाव होतं. वुलगारू तिकडे गेला आणि त्याने गावाची लाकडी वेस मोडून टाकली. त्या आवाजाने सगळे गावकरी जमा झाले. वुलगारूनं त्यांना घाबरवून सोडलं.

तो माणूस नसता (म्हणजे त्याने वुलगारू बनवला नसता), तर तिथे कधीही वुलगारू आला नसता आणि त्या गावातली लहान मुलं रात्रीच्या अंधारात सुरक्षित बाहेर फिरू शकली असती. पण आता आया मुलांना ताकीद देऊ लागल्या, की रात्री बाहेर जायचं नाही. गेलात, तर तो वुलगारू तुम्हाला पकडून नेईल.

स्टॅलोसुद्धा सैतानांचा सैतान होता. पण तो वुलगारूपेक्षा वेगळा होता.

त्याच्यापेक्षा जास्त चलाख होता. स्टॅलो राहायचा उत्तरेकडे. हिमवर्षाव आणि बर्फाच्या प्रदेशात. तिथं लोकांची घरं एकमेकांपासून लांब लांब असायची.

नाताळचे दिवस होते. सॅमी रेनडिअरचा कळप संभाळणारं एक कुटुंब होतं. एका पठारावर ते त्यांचा कळप ठेवायचे. ते नाताळच्या सणाची तयारी करत असताना अचानक बर्फ पडायला लागला. म्हणून कुटुंबातली मोठी माणसं चर्चमध्ये गेली, पण लहान मुलांना घरी ठेवलं. त्यांचं घर म्हणजे तंबूच होता. त्यांच्या तंबूपासून जवळच एक म्हातारी आणि तिची मुलगी राहत होती. म्हातारीने आपल्या मुलीला बाहेर जाऊ दिलेलं नव्हतं, कारण नाताळचा काळ जितका पवित्र, तितकाच धोक्याचाही असतो. या काळात वाईट, दुष्ट आत्मे अंधारात फिरत असतात. ते लहान मुलं आणि पशू यांच्यावर टपलेले असतात. म्हातारीने अगोदरच घराबाहेर थोडं अन्न आणि दूध ठेवलं होतं. दुष्ट आत्म्यांमधला सगळ्यांत शक्तिमान वाईट आत्मा जो स्टॅलो होता, त्याची बर्फातली गाडी ओढणाऱ्या रेनडिअर पशूंसाठी.

पलीकडच्या तंबूत लहान मुलं एकटीच होती. मोठी माणसं त्यांना बजावून गेली होती, की अगदी शांत बसायचं. नीट वागायचं. भांडायचं नाही. सुरुवातीला मुलं घाबरून गप्पच बसलेली होती. पण अखेर मुलंच ती. शांत बसायचा त्यांना आला कंटाळा; मग ती घर घर खेळू लागली. त्यात मोठी मुलं बनली आई-बाबा आणि लहानांना केलं रेनडिअर. खेळ पुढे चालला, तसं मोठ्या मुलांनी लहान मुलांना मारून टाकलं, आणि चुलाणावर पाणी तापायला ठेवलं.

इकडे लहान मुलांचे किंचाळण्याचे आवाज ऐकून जवळच राहणाऱ्या म्हातारीला खूप काळजी आणि भीती वाटायला लागली. मुलांच्या तंबूत काय घडत असेल ते तिच्या लक्षात आलं, आणि आपण जाऊन मदत केली पाहिजे असं वाटू लागलं. म्हणून अतिशय घाबरून जाऊन तिने आपली बर्फात चालवण्याची गाडी काढली. आपल्या लहान मुलीला बरोबर घेतलं, आणि निघाली. बाहेर इतका मिट्ट काळोख होता, की झाडंसुद्धा दिसत नव्हती. सोसाट्याचा वारा घोंघावत होता आणि खालच्या बर्फात पाय खोलवर रुतत होते. आपण बाहेर निघालो आहोत हा केवढा भयानक धोका पत्करला आहे हे त्या म्हातारीला माहिती होतं. तिच्या मनात धास्ती होती, की कदाचित काही दुष्ट शक्ती आपल्याला तिथपर्यंत पोहोचू न देण्याचा

प्रयत्न करतील. असं असलं तरी ती बाहेर पडलीच; आणि बाहेर पडल्याबरोबर तिच्या हाता-पायांवरची केसांची लव ताठ उभी राहिली. जणू तिला धोक्याची सूचनाच मिळाली होती! तिने आपल्या मुलीला जाड जाड पांघरुणाखाली गाडीत दडवून ठेवलं होतं. ती आपली गाडी चालवू लागली, तसतसा खाली साचलेला बर्फ उडत होता.

तिची प्रत्येक हालचाल स्टॅलो टिपत होता. त्याने तिचा पाठलाग करायला सुरुवात केली. पहिल्यांदा अगदी आत्मविश्वासाने आणि नंतर मात्र भयानक कठोरपणे. कारण त्याच्या लक्षात आलेलं होतं की म्हातारी अनुभवी असल्याने हुशार आहे. म्हणून स्टॅलोने चंद्राचं रूप धारण केलं आणि त्या खोट्या चंद्राचा प्रकाश अचानक म्हातारीच्या वाटेवर पसरला. पण हा प्रकाश एकदम आला कुठून, याचं आश्चर्य करायला म्हातारी थांबली नाही. कारण अशी विचित्र दृश्ये ही फसव्या वाईट शक्तींची करामत असू शकते, हे तिला शिकवलं गेलं होतं. उलट आता ती अधिकच वेगाने गाडी चालवू लागली. स्टॅलोने झटकन् एका झाडावर झेप घेतली आणि अशा एका फांदीवर दबा धरून बसला; की म्हातारी तिथून जाताना बरोबर त्याच्या पकडीत सापडली असती.

पण म्हातारीसुद्धा धूर्त होती. त्या झाडाजवळून जायच्या वेळी तिने स्वतःच्या डोक्याला गुंडाळून घेतलेला स्कार्फ सैल करून ठेवला. कारण तिला फांदीवर हात पुढे करून बसलेल्या स्टॅलोची सावली दिसली होती. ती जेव्हा झाडापाशी पोचली, तेव्हा स्टॅलोने तिला पकडायचा प्रयत्न केलाच. जेव्हा तिच्या डोक्यावरचा स्कार्फ त्याच्या हातात आला, तेव्हा तो लगेच उल्हसित झाला. पण ते फडकं त्याच्या हातात सोडून ती पुढे निघून गेली.

शेवटी जिथे गावकरी जमले होते, त्या ठिकाणी म्हातारी पोचली. तिने आपली भयंकर कहाणी सांगितली, पण कुणीही तिच्यावर विश्वास ठेवेना. तिने डोळ्यांत पाणी आणून वारंवार त्यांना आपली कहाणी सांगितली. आपल्याला कसा डोक्यावरचा स्कार्फसुद्धा गमवावा लागला हे ती सांगत असताना कुणाला तरी तिच्या गाडीला लटकणारा स्कार्फचा तुकडा दिसला. तेव्हा कुठे लोकांचा विश्वास बसला आणि ते तिच्यासोबत मुलांच्या तंबूकडे गेले. पण तोपर्यंत फार उशीर झालेला होता. ती मुलं, आणि रेनडिअरची गाडी सगळं काही दगड होऊन पडलेलं होते.

जी लहान मुलं शांत बसत नाहीत, त्यांना खाऊन टाकणारा असा स्टॅलो हा दुष्टात्मा आहे. जेव्हा कुटुंबातली मोठी माणसं बाहेर गेली, तेव्हा त्यातल्या दोन मोठ्या मुलांनी खूप मोठमोठे आवाज करत दंगा केला. तेव्हा एक मोठा काळा पक्षी येऊन जवळच्या झाडावर बसला आणि मग तंबूत शिरला. तिथे तो काही वेळ विस्तवाजवळ बसला आणि मग त्याचे मोठ्या काळ्या कुत्र्यात रूपांतर झाले. तो स्टॅलो होता. लहान मुलांना मारून टाकण्याच्या वेळी तो हे रूप घ्यायचा. काही लोक सांगतात, की स्टॅलो कुत्रा होऊन म्हातारी आणि तिच्या मुलीमागे धावत सुटला होता. पण जेव्हा त्याने 'कौटो कीनोचं' चर्च पाहिलं, तेव्हा उलट फिरून पळून गेला.

आता तिकडच्या आया पूर्वीसारखंच त्यांच्या मुलांना ताकीद देत असतात, की शांत बसा आणि अंधारात बाहेर जाऊ नका. नाहीतर तंबूतल्या मुलांसारखं तुमचंही होईल. तो स्टॅलो तुम्हाला पकडेल आणि दगड बनवून टाकेल आणि आता ही गोष्ट. ही आहे डॅश आणि सैतानाच्या मुलीची.

त्याचं खरं नाव डॅश नव्हतं. पण खरं नाव आता कुणालाच माहिती नाही. तो दक्षिणेकडचा होता. त्याच्या आवाजात दक्षिणेकडच्या लोकांसारखी एक उबदार छटा होती, त्यामुळे तो भारदस्त वाटायचा. हा माणूस पत्त्यात कधीही हरायचा नाही. मी त्याला डॅश नाव दिलं, कारण तो होताच तसा धाडसी आणि डॅशिंग.

एका रात्री असाच तो एका अनोळखी माणसाशी पत्ते खेळत बसला आणि सारखा आपला जिंकत राहिला. यात काही नवल नव्हतं. डॅश होताच पत्ते खेळण्यात पटाईत. होता होता तो बार बंद व्हायची वेळ आली. पण डॅश आणि तो अनोळखी माणूस खेळतच राहिले. तो बारचा मालक अस्वस्थ झाला. सारखा डॅशला खाणाखुणा करून सांगू लागला, की वेळ संपली आहे, खेळ थांबवा. पण आज डॅशचं नशीब पूर्वी कधीच नसेल इतकं जोरावर होतं. त्याने बार मालकाकडे लक्षच दिलं नाही. आणि जेव्हा त्या समोरच्या माणसाकडचे सगळे पैसे संपले, तेव्हा डॅश ने खेळ थांबवला. आणि त्या माणसाशी रीतीप्रमाणे शेक हॅण्ड करण्यासाठी हात पुढे केला. त्यावर तो माणूस गुरगुरला, 'अरे, तू तर मला कंगाल करून सोडलंस! पार धुऊन काढलंस!'

''हा! अजूनही तू मला पैसे द्यायचे बाकी आहेत मित्रा! हा डॅश जुगारात जिंकलेले पैसे कधीच सोडत नसतो!'' डॅशने ठणकावलं.

यावर तो माणूस क्षीण आवाजात म्हणाला, ''जाऊदे ना यार!''

त्याचेच शब्द उचलत बारमालक ओरडून डॅश ला म्हणाला ''ए डॅश, जाऊ दे ना यार त्याला! आज पुष्कळ माल जिंकला तू. जाऊदे सोड त्याला.'' पण डॅश सोडणारच नव्हता. त्यानं झटकन् खिशातलं पिस्तुल काढलं आणि त्या अनोळखी माणसावर रोखत नीचतम आवाजात म्हणाला, ''मुकाट्यानं पैसे काढ! डॅशला पैसे न देता आजवर कुणीच इथून गेलेलं नाही. समजलं ना?''

तो अनोळखी माणूस संतापून ताडकन् उठून उभा राहिला. आणि एकाच लाथेनं त्यानं डॅशच्या हातातलं पिस्तूल दूर भिरकावलं. त्याच क्षणी त्याच्या डोक्यावरची हॅट खाली पडली आणि डॅशनं पाहिलं, की त्याने साक्षात सैतानाशीच पंगा घेतलेला होता! डॅश हादरलाच!

''ठीक आहे!'' घायाळ सैतान गरजला. ''देतो तुला पैसे! उद्या दुपारी माझ्या घरी येऊन घेऊन जा. आणि जर का आला नाहीस, तर लक्षात ठेव. मी किंमत वसूल करीन!''

डॅशला वाटलं की, त्याचं रक्त धमन्यांच्या आतच गोठून गेलं आहे!

''होय मालक! तो कसाबसा बारीक आवाजात बोलला आणि पळत, रांगत बाहेर पळाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो पुन्हा बारमध्ये आला. बारमालक खूप रागावलेला होता. मी तुला सांगत होतो की जाऊदे, सोडून दे त्याला. पण तू ऐकलं नाहीस. तुझ्या कानात दडे बसले होते. आता बघ कोणत्या त्रासात सापडलास तू! पण नंतर बारमालक शांत झाला आणि त्याने डॅशची विनंती मान्य केली. मग त्याने डॅशला नदीच्या किनाऱ्यावर पाठवलं. तिथं एक म्हातारा नावाडी ऊन खात बसला होता. डॅशनं त्याला विचारलं, नावाडी महाशय, तुम्ही मला नदी पार करून पलीकडच्या तीरावर सैतानाच्या घरापाशी नेऊन सोडाल का?

नावाडी म्हणाला, ''त्या फेऱ्या आम्ही पाच वर्षांपूर्वी बंद केल्या. कारण सैतानाच्या घरून कुणीच परत येत नाही.''

''पण तुला तिकडं जायची अगदी निकडच असेल, तर एक गरुड पक्षी आहे, तो तुला तिथं उडत घेऊन जाऊ शकतो. पण जाताना मटणाची एक मोठी तंगडी सोबत ठेव. कारण त्या गरुडाला वाटेत सारखी भूक लागत राहते.''

डॅशने त्या गरुडाला गाठून त्याच्याबरोबर ठरवून घेतलं. मांस कमी पडू नये म्हणून त्याने वर्ष -दीड वर्षाचं एक वासरूच बरोबर घेतलं. ते दोघे साधारण पाव भाग अंतर उडून गेल्यावर गरुड गायला लागला, ''पाणी. फक्त निळं निळं पाणी! मला दुसरं काहीच दिसत नाहीये. फक्त मैलच्या मैल पसरलेलं अथांग पाणी!''

डॅशने ताबडतोब त्याला वासराची तंगडी तोडून दिली. गरुडाने तंगडी गट्टम् केली आणि उडायला सुरुवात केली. अर्ध अंतर गेल्यावर परत गरुड गायला लागला. ''पाणी फक्त निळं निळं पाणी. मला दुसरं काहीच दिसत नाही. फक्त मैलच्या मैल पसरलेलं अथांग पाणी! शेवटच्या टोकापर्यंत!''

डॅशने खाली पाहिलं. नदीचं रूपांतर आता समुद्रात झालेलं होतं आणि समुद्राचं पाणी प्रचंड उसळ्या घेत होतं. तो इतका घाबरला, की त्यानं आख्खं वासरूच गरुडाला देऊन टाकलं. त्या अवाढव्य पक्षानं तेही क्षणात गट्टम् केलं आणि परत तो उडू लागला. थोड्या वेळाने गरूड पुन्हा त्याचं ते विचित्र गाणं म्हणू लागला. त्याला देण्यासाठी डॅशकडे काहीच मांस उरलं नव्हतं. म्हणून डॅशनं स्वतःचा उजवा पाय गरुडाला दिला.

पुन्हा खाली पाहिलं, तर मैलोन्मैल पसरलेलं समुद्राचं पाणीच दिसलं.

थोडा वेळ गेला आणि गरुड चौथ्या वेळेला त्याचं ते विचित्र गाणं म्हणू लागला. डॅशने स्वतःचा डावा हात तोडून त्याला खाऊ घातला.

अशा प्रकारे चार वेळा जेवण केल्यानंतर गरुड खाली आला आणि त्याने डॅशला एका टेकडीच्या पायथ्याशी उतरवलं. त्या टेकडीवर एक उजाड असा किल्ला दिसत होता. त्याच्या खिडक्यांतून घोंगावणाऱ्या वाऱ्याचा आवाज डॅशला ऐकू येत होता. तिथे आजूबाजूला एकही घर दिसत नव्हतं. म्हणून डॅश टेकडी चढून गेला. आणि दरवाजा ठोठावू लागला. आतून सैतानाचा आवाज आला.

''कोण आहे रे बाहेर?'' जितक्या मोठ्या आवाजात बोलता येईल, तितका मोठा आवाज काढून डॅश ओरडला, ''मी आलो आहे, डॅश.''

आपण घाबरलो आहोत हे त्याला सैतानाला कळू द्यायचं नव्हतं. एका बाईने दार उघडून डॅशला आत घेतलं. आतमध्ये एका टेबलापाशी सोन्याने भरलेली थैली घेऊन सैतान बसलेला होता. त्याने स्वतःच्या बायकोला हाक मारून बाहेर बोलावलं आणि सांगितलं, ''एक उजवा पाय आणि डावा हात

आणून या भल्या माणसापुढं टाक पाहू !'' तिने तसं केलं आणि डॅशला त्याचा हात आणि पाय परत मिळाला. सैतानाने सोन्याची थैली डॅशकडे फेकली आणि दात विचकत गुरकावला, ''एकतर तू फार शूर माणूस असला पाहिजेस, नाहीतर मूर्ख तरी असशील. निघ इथून! चालता हो! तुझं थोबाड काळं कर!''

सैतानाला पुन्हा सांगायची वेळ येऊ न देता डॅश निघाला. क्षणार्धात बाहेर पडला. इकडे तिकडे पाहतो तर गरुड कुठेच दिसेना. तेव्हा त्याला टेकडीच्या खाली जाणारी एक अगदी अरुंद पायवाट दिसली. तो तिकडे धावला. पण वाटेच्या सुरुवातीलाच कुणीतरी त्याला मागे ओढलं. त्याने हात वर करून प्रतिकार करत वर बघितलं, की कोण मला इथून जाण्यासाठी रोखत आहे. तेव्हा त्याला एक तरुण मुलगी दिसली. ती त्या सैतानाची मुलगी होती. ती वडिलांच्या छळवादी वागण्याला विटली होती. ''तू जर मला तुझ्याबरोबर नेशील, तर मी तुला इथून सुरक्षितपणे खाली नेऊन सोडू शकते. पण तसं केलं नाहीस तर तू परत जाऊ शकणार नाहीस. कारण माझे वडील कधीच माणसाकडून हार पत्करत नाहीत.''

मग त्या दोघांनी एकजूट केली आणि त्या अवघड वाटेने सुरक्षित टेकडीच्या खाली पोचले. थोड्याच वेळात सैतानाला हे कळलं आणि तो आपल्या रथात बसून त्यांना शोधायला निघाला. त्याचे घोडे खिंकाळत होते आणि त्यांच्या नाकातून आगीच्या ज्वाळा निघत होत्या. त्यांच्यावर तिचे वडील खेकसत होते. तिला त्यांचा आवाज ऐकू आला. त्याच क्षणी तिने एक अंडं पाण्यात फेकलं. त्याबरोबर डॅश एक सरोवर झाला आणि ती मुलगी एक हंसिनी होऊन सरोवरात पोहू लागली. सोबत हंसाची पिलेसुद्धा पोहत होती.

सैतान तिथून गेला, पण त्याला ती दोघे सापडली नाहीत. त्यामुळे तो संतापाने थयथयाट करीत त्याच्या किल्ल्यात परत गेला.

समुद्राजवळ आल्यावर तिने पाण्यात काही तरी फेकलं. त्याबरोबर तिथे एक बोट तयार झाली. त्यात बसून ते दोघं समुद्र पार करून सुरक्षित दुसऱ्या किनाऱ्यावर पोचले.

त्यानंतर ते दोघे जन्मभर सुखाने राहिले का नाही, ते मला नक्की सांगता यायचं नाही.

(या कथा ओस्कल्सच्या 'सॅमी स्टोरीज्', ऑस्ट्रेलियाच्या 'अबोरीजाईन स्टोरीज्' आणि लेस्टर्सच्या 'ब्लॅक फोकटेल्स' मधून घेण्यात आल्या.)

◆

## १६ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२५ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत**

**१६ फेब्रुवारी - एकहार्ट टोले यांचा जन्मदिन**

'अवनी एक नवी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१७ फेब्रुवारी - अविनाश लोंढे यांचा जन्मदिन**

'बेधुंद' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१७ फेब्रुवारी - सदानंद कदम यांचा जन्मदिन**

'सांगाती' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७७/-**

---

**१८ फेब्रुवारी - तेहमिना दुर्रानी यांचा जन्मदिन**

'ब्लास्फेमी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**१८ फेब्रुवारी -लिसा सी यांचा जन्मदिन**

'शांघायच्या मुली', 'ड्रीम्स ऑफ जॉय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११२५/- । सवलत किंमत ८४५/-**

---

**१९ फेब्रुवारी - छ. शिवाजी महाराज जयंती**

'जाणता राजा श्री शिवछत्रपती', 'श्रीमान योगी', 'लक्ष्यवेध', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?', 'शिवछत्रपती : एक मागोवा', 'महासम्राट-झंझावात, रणखैंदळ', 'शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६६५/- । सवलत किंमत २०००/-**

---

**२० फेब्रुवारी - टोनी विल्सन यांचा जन्मदिन**

'शॅपेल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १३९/-**

**२० फेब्रुवारी - पीअर बाऊल यांचा जन्मदिन**

'द ब्रिज ऑन द रिव्हर क्वाय' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १५४/-**

**२१ फेब्रुवारी - प्रा. डॉ. कैलास सार्वेकर यांचा जन्मदिन**

'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १७९/-**

**२४ फेब्रुवारी - डॉ. सुचित तांबोळी यांचा जन्मदिन**

'मुलांच्या समृद्ध जीवनासाठी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

**२४ फेब्रुवारी - छ. राजाराम महाराज जयंती**

'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६९५/- । सवलत किंमत ४५२/-**

**२४ फेब्रुवारी - गिलियन फ्लिन यांचा जन्मदिन**

'गॉन गर्ल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ७५०/- । सवलत किंमत ५६२/-**

**२५ फेब्रुवारी - डॉ. आ. बा. पाटील यांचा जन्मदिन**

'बोन्साय', 'घरातील बाग', 'शेती करू फायद्याची', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०००/- । सवलत किंमत ६००/-**

**२५ फेब्रुवारी - डॉ. आशिष बोरकर यांचा जन्मदिन**

'स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

**२७ फेब्रुवारी - मराठी भाषा गौरवदिन**

रु. ३०००च्या खरेदीवर ४० टक्के सवलत (एका पुस्तकाची एक प्रत)

**२८ फेब्रुवारी - राष्ट्रीय विज्ञान दिन**

**संच १**-'A TO Z विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'छंदातून विज्ञान', 'साधी यंत्रे', 'विज्ञानातील रंजकता', 'विज्ञानातील गमतीजमती', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'प्रेमाचा रेणू', 'अंतराळातील मृत्यू', 'अश्मजीव', 'संकरित', 'डिंभक', 'देव?

छे! परग्रहावरील अंतराळवीर', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५६५/- । सवलत किंमत १६१२/-**

**संच २**-'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-१', 'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-२', 'असे घडले सहस्रक', 'प्रयोग वनस्पती विज्ञानाचे', 'अंतरिक्षाचा वेध','विज्ञानातील सरस आणि सुरस', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'फक्त खेळण्यांसाठी', 'खेळणीच खेळणी', 'खेळणी विज्ञानाची', 'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती', 'चला, प्रयोग करू या!' (३ पुस्तकांचा संच), 'इ.स. २५९५', 'वाचनातून विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २७२५/- । सवलत किंमत १६८४/-**

**संच ३** -'पर्यावरण प्रदूषण', 'वेध पर्यावरणाचा', 'ज्ञानदीप' 'ग्यानबाचं विज्ञान', 'सुगरणीचं विज्ञान', 'गुडबाय अर्थ', 'विज्ञान विशेष', 'भिंतींना जिभाही असतात', 'विज्ञान प्रपंच', 'वायुप्रदूषण'

**संचाची मूळ किंमत २५८०/- । सवलत किंमत १६१०/-**

**संच ४** - 'गार्डिअन', 'जॉर्ज ॲन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स', 'रोबॉट फिक्सिंग', 'स्वप्नचौर्य', 'असे शास्त्रज्ञ, असे संशोधन', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'कथारूपी खगोलशास्त्र', 'शास्त्रज्ञांचे जग', 'अशक्य भौतिकी', 'नाते ब्रह्मांडाचे', 'भिंतींना जिभाही असतात', 'प्लँटोन, 'खुजाबा', 'जॉर्ज ॲन्ड द ब्ल्यू मून', 'जॉर्ज ॲन्ड द शिप ऑफ टाइम', 'जॉर्ज ॲन्ड द अनब्रेकेबल कोड', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत,

**संचाची मूळ किंमत ६४६५/- । सवलत किंमत ४०४३/-**

---

**२८ फेब्रुवारी - स्टीव्ह मार्टिनी यांचा जन्मदिन**

'क्रिटिकल मास', 'द ॲटर्नी', 'द सिमीऑन चेंबर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ६४८/-**

## खालील संचांवर १ ते १५ मार्च दरम्यान खास सवलत

**१ मार्च - पांडुरंग कुंभार यांचा जन्मदिन**

'उधाण' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत १०५/-**

---

**४ मार्च - प्रिया कुमार यांचा जन्मदिन**

'परवाना जगण्याचा', 'प्रतिरूप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४५/- । सवलत किंमत २९८/-**

---

**४ मार्च - खालिद हुसैनी यांचा जन्मदिन**

'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स', 'अँड द माउंटन्स एकोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११५५/- । सवलत किंमत ७५०/-**

---

**४ मार्च - दिप्ती जोशी यांचा जन्मदिन**

'नि:शब्दाचे मौन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**७ मार्च - पिअर्स पॉल रीड यांचा जन्मदिन**

'अलाइव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत १०९/-**

---

**७ मार्च - ई. एल. जेम्स यांचा जन्मदिन**

'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे', 'फिफ्टी शेड्स डार्कर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३४४/-**

---

**८ मार्च - रश्मी बन्सल यांचा जन्मदिन**

'अराइज, अवेक', 'स्वप्नांचे इंद्रधनू...', 'टेक मी होम', 'कनेक्ट द डॉट्स', 'आय हॅव अ ड्रीम', 'शाइन ब्राइट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२९५/- । सवलत किंमत १७४४/-**

---

**८ मार्च - महिलादिन**

'रुपेरी सिंधू', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'कर्मयोगिनी', 'चिकन सूप फॉर

द वुमन्स सोल भाग २', 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल : भाग ३', 'नोबेल ललना - भाग १' , 'नोबेल ललना - भाग २', 'स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)', 'अंतराळवीर सुनीता विल्यम्स', 'अॅज आय सी... भारतीय पोलीस सेवा...', 'अॅज आय सी... नेतृत्व आणि प्रशासन...', 'अॅज आय सी... स्त्रियांचे सक्षमीकरण...', `Be The Change... भ्रष्टाचाराशी लढा', 'आय डेअर', 'इट्स ऑलवेज पॉसिबल', 'मजल... दरमजल...', 'व्हॉट वेंट राँग अँड व्हाय', 'दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल', 'जाणती राणी महाराणी ताराबाई', 'कृष्णसखी राजराणी मीराबाई', 'ममतेची मूर्ती मदर तेरेसा', 'रणरागिणी दुर्गाराणी', 'सती साध्वी देवी अहिल्या', 'बंधमुक्त होताना...', 'ब्रह्मकन्या', 'माय डॉटर माय मदर', 'नेतृत्वनिर्मिती', 'निर्भय प्रशासन', 'करवीर छ. इंदुमती राणीसाहेब' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६८१०/- । सवलत किंमत ४४२७/-**

---

**१२ मार्च - यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन**

'वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध', 'पहिली फेरी?', 'साहेब संध्याकाळी भेटले..', 'यशवंतराव चव्हाण आठवणी-आख्यायिका' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०५५/- । सवलत किंमत ७३९/-**

---

**१४ मार्च - शेवडे गुरुजी यांचा जन्मदिन**

शेवडे गुरुजी लिखित २१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २७६४/- । सवलत किंमत १९९०/-**

◆

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा !**

**या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com**

# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



















**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/02/2025 Posting Date : 11/02/2025

## आवर्जून वाचावे...



















लेखक : **सु.ल. खुटवड**

**जनूभाऊ कागदी घोडे**

**हास्याची 'लाट'**

**विनोदाचं गुऱ्हाळ**

लेखक : **डॉ. संजय ढोले**

**दूरचे प्रवासी**

**झाडाचं गुपित**

**अवकाशातील दूत**

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________